शुक्रवार, २२ डिसेंबर २०२३
⦿ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⦿ मराठी ⦿ दैनिक
⦿ वर्ष - ०३ ⦿ अंक - १३०
⦿ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 22 DECEMBER. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-130 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-05

पाहिजेत
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
नागपूर विभागात चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, वर्धा, नागपूर येथे जिल्हा व तालुका प्रतिनिधी नेमणे आहेत.
इच्छुकांनी आपला अर्ज व बायोडेटा फोटोसह मेल किंवा व्हॉट्सॲप करावा
प्रा. श्याम हेडाऊ
विभागीय प्रतिनिधी
98343 01568
aadhunikkesari@gmail.com

# सरन्यायाधीशांना निवडणूक आयुक्त निवडीच्या समितीतून वगळले !

## नवे विधेयक लोकसभेत मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : केंद्रीय निवडणूक आयुक्तांच्या निवडप्रक्रियेतून सरन्यायाधीशांना वगळून त्या पूर्णत: सरकारच्या नियंत्रणात आणणारे वादग्रस्त 'मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्त विधेयक गुरुवारी लोकसभेत मंजूर करण्यात आले. १० ऑगस्ट रोजी हे विधेयक सादर करण्यात आले होते. त्यानंतर राज्यसभेत १२ डिसेंबर आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले. या विधेयकात केंद्रीय निवडणूक आयुक्त निवडीच्या समितीतून सरन्यायाधीशांना वगळण्यात आले आहे.**



१९९१ मधील कायद्यात केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त व अन्य आयुक्तांच्या नियुक्ती प्रक्रियेबाबत ठोस तरतूद नव्हती. सर्वोच्च न्यायालयाने मार्चमध्ये दिलेल्या निकालात पंतप्रधान, विरोधी पक्षनेता व सरन्यायाधीश यांच्या समितीमार्फत या नियुक्त्या करण्याचे आदेश दिले होते. याच निकालात संसदेने निवडप्रक्रियेसंदर्भात कायदा करण्याची सूचनाही करण्यात आली होती. याचा आधार घेत केंद्र सरकारने 'केंद्रीय निवडणूक आयुक्त नियुक्ती व सेवास्थिती-२०२३' हे विधेयक पावसाळी अधिवेशनादरम्यान, १० ऑगस्ट संसदेत आणले होते.

सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या वेतनाइतकेच वेतन केंद्रीय निवडणूक आयुक्तांना दिले जाते. त्यात बदल करण्याचा घाट सरकारने घातला होता. आयुक्तांचा दर्जा केंद्रीय सचिवाच्या स्तरावर आणण्याची तरतूद विधेयकामध्ये होती. या दुरुस्तीला माजी केंद्रीय निवडणूक आयुक्तांसह विरोधी पक्षांनीही विरोध केला. अखेर विधेयकामध्ये दुरुस्ती करण्यात आली व केंद्रीय निवडणूक आयुक्तांचा दर्जा पुन्हा सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या समकक्ष करण्यात आला. केंद्रीय निवडणूक आयुक्तांना दिवाणी वा फौजदारी कारवाईपासून संरक्षणही देण्यात आले आहे.

मंगळवारी राज्यसभेत विधेयक आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले. या विधेयकावर टीका करत विरोधी पक्षांनी १२ डिसेंबर रोजी सभात्याग केला होता. त्यामुळे हे विधेयक मंजूर होऊ शकले. तसंच, लोकसभेत सत्ताधारी पक्षाचे बहुमत असल्याने येथेही मंजुरीसाठी प्रतीक्षा करावी लागली नाही.विधेयकातील तरतुदीनुसार केंद्रीय विधिमंत्र्यांची शोधसमिती पाच संभाव्य आयुक्तांची शिफारस करेल. विद्यमान केंद्रीय मुख्य आयुक्त अनुपचंद्र पांडे फेब्रुवारी २०२४ मध्ये निवृत्त होत असून त्यानंतर संभाव्य नवी निवडप्रक्रिया अंमलात येऊ शकेल.

# भोकर शिक्षक पतसंस्थेच्या सात संचालकांचे राजीनामे

## चेअरमनच्या कारभारावर ठपका


आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शहरातील जिल्हा परिषद शिक्षक व कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन यांच्या मनमानी कारभारास कंटाळून सात संचालकांनी राजीनामे दिले आहेत.यावर वरिष्ठ काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. मागील अनेक वर्षांपासून शहरात सदरील शिक्षक पतसंस्था कार्यान्वित आहे. संस्थेच्या वतीने आवश्यकतेनुसार शिक्षव व कर्मचाऱ्यांना आर्थिक मदत दिली जाते. यावर अंकुश ठेवण्यासाठी चेअरमन व संचालकाची निवड केली जाते.मागील अनेक दिवसांपासून चेअरमन आणि संचालकात बेनाव सूरू झाल्याने कारभारावर त्याचा विपरीत परिणाम होताना दिसते आहे.प्रकरण अगदि टोकाला आल्याने संस्थेतील सहा संचालकांनी चेअरमनच्या मनमानी कारभाराला कंटाळून राजीनामा दिल्याने एकच खळबळ उडाली आहे.यात प्रामुख्याने सुदाम घोरपडे,शीला हिवराळे,संजु बाचेवाड, वकील आडे,केशव पवार,आंनदा वाघाळकर, बालाजी पंतोजी यांनी आपला राजीनामा वरिष्ठांकडे सूपूर्त केला आहे. येथील होणा-या मनमानी कारभारावर संबंधित वरिष्ठ अधिकारी काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

# भावाला दिली किडनी; रागवलेल्या पतीने दिला 'तिहेरी तलाक'

आधुनिक केसरी न्यूज

**गोंडा :** उत्तर प्रदेशमधील गोंडा जिल्ह्यातील एका महिलेला तिच्या पतीने व्हॉट्सॲप वरून तिहेरी तलाक दिला आहे. या महिलेने आपल्या आजारी भावाला वाचविण्यासाठी मूत्रपिंड (किडनी) दान केले होते. त्यानंतर तिच्या पतीने तिहेरी तलाक दिला. पीडितेचे नाव तरन्नुम असून तिचा पती मोहम्मद रशीद हा सौदी अरेबियामध्ये नोकरी करतो. तरन्नुमने पतीला न विचारता भावाला मूत्रपिंड दान केले, याचा राग धरून त्याने पत्नीकडे ४० लाख रुपयांची मागणी केली. मात्र पत्नीने पैसे देण्यास नकार दिल असता मोहम्मद रशीदने ३० ऑगस्ट रोजी व्हॉट्सॲपवर तिहेरी तलाक देत असल्याचा संदेश पाठविला. तरन्नुम आणि रशीद यांचे २० वर्षांपूर्वी लग्न झाले होते. लग्नाच्या काही वर्षांनंतर रशीद सौदी अरेबियाला कामानिमित्त गेले. या दाम्पत्याला मूल झालेले नाही. तसेच रशीद यांनी दुसरे लग्न केलेले आहे, अशी माहिती तरन्नुमने दिली. तरन्नुमचा भाऊ मोहम्मद शाकीरचे मूत्रपिंड निकामी झाल्यामुळे त्याच्यावर मुंबईत उपचार सुरू होते. त्याचे आयुष्य वाचविण्यासाठी तरन्नुमने आपल्या भावाला मूत्रपिंड दान करण्याचा निर्णय घेतला. पाच महिन्यांपूर्वी शाकीरवर शस्त्रक्रिया करण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर तरन्नुम काही दिवसांनी गोंडा जिल्ह्यातील सासरच्या घरी परतली. तिथे गेल्यानंतर सासरची मंडळी आणि नवऱ्याशी तिचे वाद झाले. नवऱ्याने व्हॉट्सॲपवरूनच तिला तिहेरी तलाक देऊन टाकला. घटस्फोट दिल्यानंतर तरन्नुमला माहेर जाण्यास बळजबरी करण्यात आली. त्यामुळे तिने पोलिसांत तक्रार दाखल करून सासरच्या लोकांविरोधात कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी केली. जिल्ह्याचे अतिरिक्त पोलिस अधीक्षक राधेश्याम राय यांनी याबद्दलची तक्रार दाखल करून घेतली असून पुढील कार्यवाही सुरू केली आहे.



**भारतात तिहेरी तलाकवर बंदी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकारने २०१९ साली कायदा संमत करून तिहेरी तलाकवर बंदी आणली आहे. "एका मध्ययुगीन रानटी प्रथेला आज इतिहासाने कचऱ्यात जमा केले आहे. मुस्लीम महिलांवर झालेल्या अन्यायाचे आता निवारण झाले आहे. समानतेसाठीच्या महिलांच्या लढ्याचा हा विजय असून याने समाजात समतेलाच वाव मिळणार आहे. देश हा दिवस साजरा करीत आहे", अशी प्रतिक्रिया कायदा मंजूर झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली होती.

# राज्यात थंडीचा कडाका वाढल्याने रब्बी पिकांना दिलासा

## दाट धुक्यामुळे फटका बसण्याचीसुद्धा शक्यता

आधुनिक केसरी न्यूज

विनोद पाटील खडसे


रिसोड : गेल्या तीन चार दिवसापासून शहारासह तालुक्यात थंडीच्या कडाक्याचा जोर कमालीचा वाढला आहे. त्यामूळे हरभऱ्यासह गहू,कांदा,मोहरी, ज्वारी, आदी पिकांसाठी थंडी पोषक असल्याने शेतकऱ्यांना थोडाफार दिलासा मिळाला आहे. मात्र तापमानात सातत्याने चढउतार होत असल्याने काही भागात दाट धुके सुद्धा पडत आहे. धुक्यामुळे रब्बी पिकांना फटका बसण्याची शक्यता असते,परिणामी थंडीचा दिलासा तर धुक्याची चिंता वाटत असल्यामूळे शेतकऱ्यांची द्विधा मनःस्थितीत झाली आहे. नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तुरीच्या पिकाला मोठा फटका बसला असून बहुतांश शेतकऱ्यांना हरबऱ्याची दुबार पेरणी करावी लागली आहे.तर अनेक शेतकऱ्यांना तूर उपटून गहू पेरावा लागला आहे. त्यामूळे



शेतकऱ्यांची आर्थिकस्थिती खूपच बिकट झाली आहे.परंतु गेल्या तीन चार दिवसापासून थंडीचा जोर वाढला आहे. रब्बी हंगामातील पिकांसाठी थंडी खुप महत्त्वाची असते. थंडीमुळे रब्बी पीक अधीक बहरतात असे अनेक अनुभवी शेतकरी बोलतात. मात्र त्यासाठी वातावरण निर्मळ असायला हवे असाही शेतकऱ्यांचा अनुभव आहे. सध्यस्थितीत थंडीचा कडाका वाढला असला तरी वातावरणातील चढउतार शेतकऱ्यांची चिंता वाढवीत आहे. थंडीच्या गारव्यासोबतच ढगाळसदृश स्थिती निर्माण झाल्यामुळे काही भागात दाट धुके पडत आहे. त्यामूळे रब्बी पिकांना फटका बसण्याची शक्यता सुद्धा निर्माण झाली आहे. धुक्यामुळे हळद व इतर बागायती पिके करपण्याची भीती वाटत असल्यामूळे शेतकरी धास्तावले आहेत. तर पोषक असणाऱ्या थंडीमुळे थोडाफार दिलासा सुद्धा मिळत आहे. द्विधा मनःस्थितीत असलेल्या शेतकऱ्यांना रब्बी हंगामात तरी निसर्गाची साथ मिळेल अशी अपेक्षा कडाक्याच्या थंडीमुळे लागली आहे.

**धुके व ढगाळ वातावरणामुळे बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता :** काही भागात कोरडे धुके आणि ढगाळसदृश वातावरण निर्माण होत असल्यामूळे हरभरा, गहू, कांदा, हळद आदी पिकांवर बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तर ढगाळ वातावरणामुळे पुन्हा आळ्यांचा प्रार्दुभाव वाढू शकतो. त्यामूळे पहिलेच आर्थिक विवंचनेत असलेले शेतकरी निसर्गाच्या लहरी स्वभावामुळे अधिकच चिंताग्रस्त झाले आहेत. अशा द्विधा मन :स्थितीत असलेल्या शेतकऱ्यांना कृषि विभागाकडून केवळ मार्गदर्शनच नव्हे; तर उद्‌भवणाऱ्या परिस्थितीवर मात करण्यासाठी कीटकनाशक व इतर आवश्यक असणारी सामुग्री मोफत उपलब्ध करून दिल्यास खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल.

गेल्या चार पाच दिवसापासून थंडीचा जोर दिवसेंदिवस वाढतच आहे. त्यामूळे मरगळीस आलेल्या हरभरा पिकाने कात टाकली आहे. परंतु सकाळी सकाळी कोरडे धुके पडत असल्यामूळे हळद पिकाची पाने वाळून जागीच करपून जात आहेत. रब्बी पिकांसाठी थंडी पोषक असते,पण त्यासाठी वातावरण निर्मळ असायला हवे..! थंडीने दिलासा मिळाला असला तरी दाट धुक्यामुळे आणि आभाळातील खरखरी चिंता वाढवत आहे. एकंदरित सर्वच शेतकरी द्विधा मन :स्थितीत आहेत..!"
**पंडितराव सानप, (शेतकरी, लोणी बु. ता. रिसोड)**





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




आधुनिक केसरी

तसे आमचे संस्कृत लहानपणापासून कच्चे. आता अर्थात ते सुधारण्याचा संभव कमीच ! संस्कृतमध्ये काही काही शब्द वेगळ्या अर्थाने येतात. आपल्या मराठीत आणि त्यांच्या मूळ अर्थात फरक असतो. पण आम्हाला हे सांगतो कोण ? लहानपणी रामरक्षा म्हणायचो. अर्थ कळायचा नाही. रामरक्षा म्हणताना ' रामम रमेशम भजे ' असे शब्द यायचे. लहानपणी ' भजे ' म्हणजे भजणे किंवा आळवणे हा अर्थ माहितीच नव्हता. पुढे तो केव्हा तरी कळला. तोपर्यंत देवासमोर बसून रामरक्षा म्हणताना हे शब्द आले की आम्हाला भजेच आठवायचे. कधी कधी रामरक्षा म्हणताना समोर डिशमध्ये गरमागरम भजी ठेवली आहेत, आणि ते स्तोत्र म्हणत असताना ती अधूनमधून तोंडात टाकतो आहोत अशी कल्पनाही यायची. तसेच कधीतरी ' चरैवती चरैवती ' हे शब्द कानावर पडले होते. मूळ अर्थ माहित असण्याचे काही कारणच नव्हते. लहानपण एका अगदी छोट्याशा खेड्यात गेले. आमच्याकडे शेती असल्याने गाई, बैल वगैरे असायचेच. सकाळी गाई चरायला जायच्या. बैल रिकामे असले तर शेतात चरायला सोडले जायचे. बकऱ्या देखील चरून यायच्या. घरात सुद्धा आम्ही स्वयंपाकघरातील डबे उचकून काही खायला मिळते का हे पाहत असायचो. तेव्हा घरातल्या कोणाचे तरी बोल कानावर पडायचे, ' सारखा चरत असतोस ' त्यामुळे चरणे म्हणजे सतत खाणे हा अर्थ आमच्या मनात अगदी फिट्ट बसला होता. म्हणून जेव्हा ' चरैवती चरैवती ' शब्द कानावर पडले तेव्हा त्यांचा या चरण्याशी म्हणजेच खाण्याशी संबंध असावा असे आमच्या बालबुद्धीस वाटून गेले असल्यास नवल नाही ! त्यामुळे ऋग्वेदात सुद्धा आपल्याला आवडणारी काहीतरी गोष्ट सांगितली आहे हे लक्षात येऊन आम्हाला अतिशय आनंद झाला होता. नंतर कधीतरी महर्षी चार्वाकांचा पुढील 'श्लोक कानी पडला होता. त्यात म्हटलं होतं यावज्जीवेत सुखं जीवेद ऋणं कृत्वा घृतं पिवेत, भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः ॥' यात ते म्हणतात जोपर्यंत जीवन आहे तोपर्यंत ते सुखाने जगून घ्या. हवं तर कर्ज काढून दूध तूप खा प्या. ( कर्ज घ्यावे की नाही, ते फिटेल की नाही याची चिंता करू नका )अहो, जोपर्यंत शरीर आहे, तोपर्यंत मौजमजा करून घ्या.



## आनंदी पहाट

## सलोख्याचे क्षण क्षमाशीलता निर्माण करतात

आधुनिक केसरी

क्षमा आणि सलोखा मानवी अनुभवाच्या प्रत्येक क्षेत्रात, वैयक्तिक, समुदाय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरांसह होऊ शकतो. क्षमा आणि सलोखा याविषयी कोणतीही चर्चा करताना, त्या प्रत्येकाचे अधिक तपशीलवार विश्लेषण करण्यापूर्वी दोघांमध्ये फरक करणे महत्त्वाचे आहे. एकीकडे, क्षमा करण्याचा अर्थ चुकीच्या व्यक्तीशी समेट करणे असे नाही. तुम्हाला समेट करण्याची इच्छा नसण्याची अनेक कारणे असू शकतात. सलोखा निर्माण करणे हा एक अतिरिक्त पर्याय आहे.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

दुसरीकडे, आपण ज्याला क्षमा करण्याच्या मार्गावर गेलेलो नाही त्याच्याशी समेट करणे जवळजवळ अशक्य आहे. क्षमा ही एक प्रक्रिया आणि निवड दोन्हीही आहे; ते आंतरवैयक्तिक आणि परस्पर दोन्ही असू शकते. ही एक गुंतागुंतीची आणि गूढ संकल्पना आहे, ती कमी करणे कठीण आहे; कारण ती वेगवेगळ्या परिस्थितीत वेगवेगळ्या प्रकारे लागू होऊ शकते. प्रत्येकजण त्याच पद्धतीने अनुभवत नाही. प्रत्येक समुदायाच्या समर्थकांनी हे देखील समजून घेतले पाहिजे, की जर समाजातील सदस्यांनी - अधिकारी आणि नागरिक या दोघांसह - क्षमाशील वृत्ती अंगीकारली, तर ते सार्वजनिक आरोग्य आणि समुदाय उभारणीचे एक अतिशय उपयुक्त साधन असू शकते. क्षमा केल्याने चांगले आरोग्य परिणाम मिळतात, चांगले संबंध टिकवून ठेवण्यास मदत होते आणि चिंता कमी होते. क्षमाशीलतेसाठी तुमच्यासाठी महत्त्वाची असलेली एखादी गोष्ट सोडून देणे आवश्यक असू शकते, जसे की तुमचा नैतिक राग, बदला घेण्याची तुमची इच्छा किंवा योग्य असण्याची तुमची आसक्ती होय. तरीही क्षमा करणे समाजाच्या उभारणीसाठी उपयुक्त आहे, कारण क्षमा करणारे लोक त्यांच्या अपेक्षांमध्ये अधिक लवचिक असतात. क्षमाशील लोकांनी पूर्वग्रह विसरून कोणतीही तक्रार कायम न करण्याचे ठरवले पाहिजे.



आधुनिक केसरी

## गोविंदुची खुण | हरिनामी ||

नामाच्या गजरी | रमले हे मन ||
अखंड भजन | विठ्ठलाचे ||२||
जडला जीवाला | छंद भजनाचा ||
आत्म चिंतनाचा | ध्यास लागे ||२||
नको आणिकांचा | विचार अंतरी ||
गाथ-ज्ञानेश्वरी | श्वास झाला ||३||
मानस वारीचा | झालो वारकरी ||
देह हा पंढरी | जन्म झाला ||४||
काय मज ठावे | सगुण निर्गुण ||
गोविंदुची खुण | हरिनामी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## निरुपण

आधुनिक केसरी

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
स्वगुणपरीक्षानाम समास तिसरा ॥ ३ ॥
मायेबापें होतीं संपन्न ।त्यांचें उदंड होतें धन ।
तेणें करितां प्रतिष्ठा मान ।जनीं जाला होता ॥ ४ ॥
भरम आहे लोकाचारीं ।पहिली नांदणूक नाहीं घरीं ।
देवसेंदिवस अभ्यांतरीं ।दरिद्र आलें ॥ ५ ॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

सद्गुरु अरु सद्ग्रन्थ में, सेव्य सत्य विश्वास ।
तन मन धन ता शरण में, कह श्रद्धा भ्रम नाश ।।९४।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय) ०६/०६/९४
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
सद्गुरूंच्या प्रती सेवाभाव आणि आर्ष ग्रंथांमधे सत्य विश्वास तथा सद्गुरूंच्या शरणात तन, मन, धनाने आश्रय घेणे याला श्रद्धा म्हणतात, ज्यामुळे भ्रमाचा नाश होतो.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## संत चोखामेळा

आधुनिक केसरी


चोखोबांचा मृत्यू गावकुसाच्या कामात दरड कोसळून झाल्याचे सांगितले जाते. त्यांच्या मृत्यूनंतरही त्यांच्या हाडांतून विठ्ठल नामाचा गजर ऐकू येत होता, यावरून नामदेवांनी चोखोबांची हाडे ओळखून ती गोळा केली व पंढरपूरला विठ्ठल मंदिरासमोर त्यांची समाधी बांधली असे चरित्रकार सांगतात. संत चोखोबा हे एक, संत ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीतले संत होते. संत नामदेव हे त्यांचे गुरू होत. तत्कालीन सामाजिक विषमतेमुळे चोखोबा होरपळून निघाले. ते शूद्र-अतिशूद्र, गावगाडा, समाज जीवन, भौतिक व्यवहार, उच्चनीचता व वर्णव्यवस्था यांच्या विळख्यात अडकले. संत चोखामेळा हे प्रापंचिक गृहस्थ. ते उदरनिर्वाहासाठी मोलमजुरी करत, पण ते विठ्ठलाच्या नामात सतत दंग असत. गावगाड्यातील शिवाशिवीच्या वातावरणात त्यांचा श्वास कोंडला जात होता. दैन्य, दारिद्र्या, वैफल्य यांमुळे ते लौकिक जीवनात अस्वस्थ होते. परंतु प्रत्यक्ष परमेश्वराने त्यांना जवळ केले, त्यांना संतसंग लाभला. त्यांना मंदिरांत प्रवेश नव्हता. श्रीविठ्ठलाला त्यांना इतरांप्रमाणे उराउरी भेटावे असे खूप वाटत होते. परंतु ते सावळे, गोजिरे रूप महाद्वारातूनच पाहावे लागे, ही खंत त्यांच्या मनात होती. चंद्रभागा नदीच्या वाळवंटात आध्यात्मिक लोकशाही संत ज्ञानदेवांमुळे १३व्या शतकात उदयाला आली. म्हणून संत चोखोबा म्हणतात, 'खटनट यावे, शुद्ध होऊनी जावे। दवंडी पिटीभावे डोळा।।' ... असा पुकारा करून त्यांनी वारकरी संप्रदायातील अध्यात्मनिष्ठ, अभेद भक्तीचे लोण आपल्या उपेक्षित बांधवांपर्यंत नेऊन पोहोचवले. आत्मविकासाची संधी तत्कालीन समाजरचनेतील अगदी तळातील लोकांनाही मिळावी असे ज्ञानेश्वरादी सर्वच संतांना प्रांजळपणे वाटत होते. त्याच वेळी संत चोखोबांनी भक्तिमार्गाचा संदेश आपल्या अभंगांतून समाजबांधवांना दिला.



## सर्वांचे विस्मरण करून रामच आठवावा

आधुनिक केसरी

अकर्तेपणे करीत राहावे कर्म ।हाच परमात्मा आपलासा करून घेण्याचा मार्ग ॥ न करावा कोणाचा द्वेष मत्सर ।सर्वांत पाहावा आपला रघुवीर ॥ परनिंदा टाळावी ।स्वतःकडे दृष्टि वळवावी ॥ गुणांचे करावे संवर्धन ।दोषांचे करावे उच्चाटन ॥ जेथे जेथे जावे ।चटका लावूनच यावे ॥ याला उपाय एकच जाण । रघुनाथावांचून न आवड दुजी जाण ॥ देहाचे दुःख अत्यंत भारी ।रामकृपेने त्याची जाणीव दूर करी ॥ मनावर कशाचाही न होऊ द्यावा परिणाम ।हे पूर्ण जाणून, की माझा त्राता राम ॥ अभिमान नसावा तिळभरी।निर्भय असावे अंतरी ॥ जे दुःख देणे आले रामाचे मनी ।ते तू सुख मानी ॥ देह टाकावा प्रारब्धावर।आपण मात्र साधनाहून नाही होऊ दूर ॥ मी असावे रामाचे । याहून जगी दुसरे न दिसावे साचे ॥ प्रपंचातील सुखदुःख ठेवावे देहाचे माथा ।आपण न सोडावे रघुनाथा ॥ आपण नाही म्हणू कळले जाण । ज्ञानाचे दाखवावे अज्ञान ॥ दोष न पाहावे जगाचे ।आपले आपण सुधारून घ्यावे साचे ॥ कोणास न लावावा धक्का ।हाच नेम तुम्ही राखा ॥ एक



रामसेवा अंतरी ।सर्वांभूती भगवद्भाव धरी ॥ राम ज्याचा धनी ।त्याने न व्हावे दैन्यवाणी ॥ नका मागू कुणा काही ।भाव मात्र ठेवा रामापायी ॥ वाईटांतून साधावे आपले हित ।हे ठेवावे मनी निश्चित ॥ भगवंताचे विस्मरण ।हे वस्तूच्या मोहाला कारण ॥ म्हणून भक्ति व नाम ।याशिवाय ऐकू नये कोणाचे ज्ञान ॥ परिस्थितीचा निर्माता परमात्मा जाण ।त्यातच त्यास पाहावे आपण ॥ सर्व कर्ता राम हा भाव ठेवता चित्ती ।खऱ्या विचारांची जोडेल संगति ।व्यवहारातील लाभ आणि हानि ।मनापासून आपण न मानी ॥ मी आहे रामाचा ही जाणीव ठेवून मनी ॥ सुखाने वर्तत जावे जनी ॥ एकच क्षण ऐसा यावा ।जेणे सर्वांचे विस्मरण करून रामच आठवावा ॥ रामाविण उठे जी जी वृत्ति । त्यासी आपण न व्हावे सांगाती ॥ मी रामाचा हे जाणून ।वृत्ति ठेवावी समाधान ॥ धन्य मी झालो ।रामाचा होऊन राहिलो ।ही बनवावी वृत्ति । जेणे संतोषेल रघुपति ॥ वृत्ति बनविण्याचे साधन ।राखावे परमात्म्याचे अनुसंधान ॥ शरीरसंपत्ति क्षीण झाली ।तरी वृत्ति तशी नाही बनली ॥ विषयाधीन जरी होय वृत्ति।तरी दुरावेल तो रघुपति ॥ संतांची जेथे वस्ती ।तेथे आपली ठेवावी वृत्ति ॥ सतत विवेक अखंड चित्ती। रामनामी मनोवृत्ति ।हेचि तुम्हा परम प्राप्ति ॥ नामामध्ये ऐसी सत्ता ।जेणे जोडे रघुनाथा ॥ नामापरते न मानावे हित ।हेच आजवर सांगत आलो सत्य ॥ भगवंताला आपले होणे आवडते फार ।श्रीरामनामी राहावे खबरदार ॥
१५१. रघुनाथस्मरणात असावे आनंदात ।तेथे न चाले कोणाची मात ॥



# सनी साळवे खून प्रकरणी चार आरोपींना जन्मठेप

## न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल : नातलगांनी मानले आभार

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** दलित हत्याकांड सनी साळवे खून प्रकरणी एक ऐतिहासिक निकाल लागला आहे शहरातील देवपूर भागात २०१८ साली सशस्त्र हल्ल्यात खून झालेल्या सनी साळवे खून प्रकरणात धुळे न्यायालयात चार आरोपींना जन्मठेप ची शिक्षा लागली आहे. त्याच अनुषंगाने मयत सनी साळवे त्यांचा संपूर्ण परिवार व सर्व आंबेडकरी समाज न्यायालयाच्या बाहेर एकत्र होऊन एकमेकांना पेढे भरून जल्लोष केला व महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून घोषणा देण्यात आल्या. चंदननगर येथील सनी साळवे यांचा 18 एप्रिल 2018 ला खून झाला होता या खून खटल्यातील काही आरोपी अनेक वर्षापासून तुरुंगात होते. 16 वर्षाच्या शालेय विद्यार्थी सनी साळवे सोबत सुमित सूर्यवंशी, सागर साळवे यांना मारहाण झाल्यानंतर सिद्धिविनायक हॉस्पिटल येथे उपचारासाठी आणलेल्या ठिकाणी पुन्हा मारहाणीचा प्रयत्न करण्यात आला होता व दहशत करण्याचा प्रयत्न करण्यात आला ही अत्यंत घाणेरडी घटना होती. शहरातील वातावरण खूप दूषित आहे गुंडांनी भरले आहे त्यासाठी हे कमी होण्यासाठी सरकारी वकील व विशाल साळवे यांनी जीव तोडपणे केस चालवली. धुळे न्यायालयातील वकील संघाचे एकजूट दाखवून आरोपीचे वकील पत्र नाकारून सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न केला आहे असा संदेश देणारे धुळ्यातील एकमेव वकील संघ आहे विशेष सरकारी वकील शामकांत पाटील यांनी अतिशय मेहनत घेतली आहे व त्याचसोबत सीडी सोनार,निलेश दुसाने, उच्च न्यायालयातील ॲडव्होकेट निलेश देसले यांनी देखील शेवटपर्यंत खूप मेहनत घेतली आहे त्याचबरोबर समाजातील सर्व कार्यकर्त्यांची तेवढीच मेहनत आहे सर्वांनी संघटित होऊन काम केले आहे म्हणून हा मोठा निकाल लागला आहे व समाज बांधवांमध्ये न्यायालयाबद्दल मोठा विश्वास वाढला आहे.

# हभप शालिग्राम महाराज सुरळकर यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील नांदा तांडा येथे मीक्षदा एकादशी गीता जयंती दिंडी नगर प्रदक्षिणा व श्रीमद् भागवत कथा व अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताहाचे गावाकऱ्यांच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे. सर्व पंचक्रोशीतील भाविक भक्तांना कळविण्यात येते की वै.हभप नारायण महाराज चारुनगर यांच्या प्रेरणेने हभप फुलसिंग महाराज साकेगाव, यांच्या आशीर्वादाने रामदेव बाबा मंदिर, विठ्ठल रुक्मिणी मंदिर, हनुमान मंदिर नांदा तांडा येथे श्रीमद् भागवत सप्ताह सुरुवात केली आहे.याप्रसंगी सरपंच वरदानसिंग चव्हाण यांच्या हस्ते हभप शालिग्राम महाराज सुरळकर भालेगाव बाजार, हभप कथा प्रवक्ते हभप संदीप महाराज ऋषीगढ यांना शाल श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला व श्रीमद् भागवत सप्ताहाला सुरुवात करण्यात आली. वर्ष २० व्यावे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही दिनांक १७/१२/३/२३ रविवारपासून २४/१२/२३ पर्यंत श्रीमद् भागवत कथा व अखंड हरिनाम सप्ताह कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे सकाळी पाच ते सहा वाजता काकडा आरती सकाळी 9 ते 12 श्रीमद् भागवत कथा दुपारी तीन ते पाच श्रीमद् भागवत कथा सायंकाळी पाच ते सहा हरिपाठ तसेच रात्री आठ ते दहा हरिकीर्तन असे दैनंदिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे या श्रीमद् भागवत कथा प्रवक्ते हभप संदीप महाराज ऋषीगढ महाल्बदा हे आहेत तसेच रविवारी हभप लखन महाराज चिंचखेडा, हभप प्रलाद महाराज कळमशेरा, हभप शालिग्राम महाराज सुरळकर भालेगांव बाजार, हभप गणेश महाराज मगर वैजापूर,हभप विठ्ठल महाराज शास्त्री चनघटे पैठण, हभप शिवशाही गोपाल महाराज धुळे,हभप तुकाराम महाराज मेहुन मुक्ताईनगर, हभप संदीप महाराज ऋषीगढ महाल्बदा यांचे सकाळी नऊ ते अकरा काल्याचे कीर्तन होईल तसेच २४/१२/२३ रविवार रोजी महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित केला आहे.तसेच संध्याकाळी ग्रंथ दिंडी सोहळा गावातून निघणार आहे तरी पंचक्रोशीतील नागरिकांनी या श्रीमद् भागवत कथा सप्ताहाचा कार्यक्रमाचा महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे पण सरपंच वरदानसिंग चव्हाण यांनी बोलताना सांगितले.



# नागपुरात 28 डिसेंबरला साजरा होणार काँग्रेसचा वर्धापन दिन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** काँग्रेस पक्षाचा 138 वा वर्धापन दिन हा नागपूर येथे साजरा करण्यात येणार आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या नागपुरात हजारो अनुयायांना बौद्ध धर्माची दीक्षा दिली व लोकशाहीच कवच असलेली राज्यघटना ज्या बाबासाहेबांनी आम्हाला दिली त्याच ठिकाणाहून प्रेरणा मिळावी म्हणून नागपूर मध्ये हा वर्धापन दिन साजरा करण्यात येणार असल्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. या पत्रकार परिषदेला चंद्रपूर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष सुभाष धोटे, वरोरा विधानसभा निर्वाचन क्षेत्राच्या आमदार प्रतिभा धानोरकर, चंद्रपूर शहर अध्यक्ष रितेश तिवारी, विनोद दत्तात्रय महिला अध्यक्ष नम्रता ठेमस्कर आदींची उपस्थित होती. काँग्रेस पक्षाच्या स्थापनेला 138 वर्ष पूर्ण झालेली आहेत. याचा औचित्य साधत कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह निर्माण व्हावा आणि लोकसभेच्या तयारीसाठी कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे या अनुषंगाने काँग्रेसच्या 138 व्या वर्धापन दिनाचा कार्यक्रम प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने नागपुरात साजरा करण्यात येणार आहे. या वर्धापन दिनाला देशभरातून दहा लाख पेक्षा जास्त नागरिक , कार्यकर्ते उपस्थित राहतील असे नियोजन करण्यात येत असून 500 पेक्षा जास्त प्रमुख मान्यवर आणि काँग्रेस पक्षाचे विविध राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित राहतील असेही यावेळी विजय वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले. काँग्रेस पक्षाला 138 वर्ष होत असल्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्यांकडून 138 रुपये किंवा त्याच्या पटीत जास्तीत जास्त रक्कम पक्षनिधी म्हणून गोळा करण्यात येणार असल्याचेही चंद्रपूर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष सुभाष आमदार सुभाष धोटे यांनी यावेळी या पत्रकार परिषदेत सांगितले .तीन राज्यांच्या यशामुळे भारतीय जनता पार्टी च्या कार्यकर्त्यांमध्ये आणि नेत्यांमध्ये अहंकार निर्माण झाला असून राज्यामध्ये मात्र सरकार विरोधात वातावरण असून येणाऱ्या लोकसभा निवडणुकीतही त्याचे पडसाद दिसून येतील असेही मत यावेळी विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केले.

**देशभरातून दहा लाख पेक्षा अधिक लोक येण्याची अपेक्षा, चंद्रपुरातून सगळ्यात जास्त कार्यकर्ते जाणार**

या कार्यक्रमाला काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे , माजी राष्ट्रीय अध्यक्ष श्रीमती सोनिया गांधी, काँग्रेसचे युवा नेते राहुल गांधी, प्रियंका गांधी , ज्या ठिकाणी काँग्रेसची सत्ता आहे अशा तिन्ही राज्यांचे मुख्यमंत्री आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे .

# अखेर सोयगाव ते सावळदबारा बाजार एसटी सुरू

## माजी सभापती चव्हाण यांच्या प्रयत्नाला यश; वाहक, चालकाचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा गावात सहा ते सात वर्षे पासून बससेवा देवळगाव गुजरी बाजारापासून एसटी हि बंदच होती. त्यामळे विद्यार्थी व जेष्ठ नागरिक यांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण व समाजसेवक तथा माजी सरपंच दारासिंग चव्हाण, प्रकाश राठोड, रामदास राठोड,ममराज जाधव, किशोर राठोड, मुरलीधर राठोड यांनी सोयगाव येथे जाऊन हिरालाल ठाकरे आगार प्रमुख यांच्या कडे लेखी निवेदनाद्वारे निवेदन देण्यात आले आले ते शेवटी सेवानिवृत्त झाले पण विद्यार्थी यांची बस चालू करा म्हणून दाखल घेतली नाही.परंतु नव्यानेच रुजू झालेले आगार प्रमुख विजय काळवणे यांच्या कडे लेखी निवेदन देताच त्यांनी तात्काळ दखल घेऊन विद्यार्थी व जेष्ठ नागरिक यांची होणारी गैरसोय टाळली आणि तात्काळ दि.१९/१२/२३ रोजी पासून मंगळवारी बाजारामुळे बंद असलेल्या एसटी दररोज प्रमाणे सर्व बसेस चालू करण्यात आल्या आहेत.गेले सात ते आठ वर्षे पासून जेष्ठ नागरिक, विद्यार्थी व महिला यांचे नुकसान होत होते.परतुं आता विद्यार्थ्यांसाठी चालू करुन दिली आहे.सावळदबारा येथे मंगळवारपासून बस सेवा सूरू झाल्याने यूवक आबालवृद्धांनी एकत्र येऊन नांदा तांडा येथे जल्लोष साजरा केला.घाणेगांव तांडा,मोलखेडा पिंपळवाडी चारुतांडा देव्हारी नांदा तांडा टिटवी,डाभा व सावळदबारा डोंगरकाठच्या आडवळणावर वसलेल्या गावांमध्ये बससेवा मंगळवार दिवशी उपलब्ध नव्हती. गावात बस सेवा नसल्याने येथील ग्रामस्थ, रुग्ण, विद्यार्थी व विद्यार्थिनींना शालेय शिक्षणासाठी तारेवरची कसरत करावी लागत होती. या गावांमधील विद्यार्थी व विद्यार्थिनी फत्तेपूर व सोयगाव, फर्दापूर येथे ये-जा करतात. बस सेवा सुरू झाल्याचा फायदा दररोज शिक्षणासाठी ये-जा करणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांना झाला आहे. या भागात बस सेवा सुरु करण्यात यावी अशी मागणी माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी बऱ्याच दिवसांपासून लावून धरली होती अखेर आगार प्रमुख विजय काळवणे सोयगाव यांनी हि बस चालू केली आहे.आणि वाहक व चालक याना बाजारात कोणत्याही प्रकारची अडचण आल्यास थेट माझ्याशी संपर्क साधावा असेही माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी सांगितले.याप्रसंगी शाळेची मुले, जेष्ठ नागरिक व महिलांनी आगार प्रमुख विजय काळवणे यांचे आभार मानले.



# निलंबन सत्र सुरूच

आधुनिक केसरी

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात विरोधी खासदारांचं निलंबन सत्र सुरूच आहे. आजही कॉँग्रेसच्या तीन खासदारांना निलंबित करण्यात आलं. यामुळे आतापर्यंत निलंबित करण्यात आलेल्या खासदारांची संख्या १४६ वर पोहोचली आहे. १३ डिसेंबर रोजी लोकसभेत गदारोळ झाला. प्रेक्षक गॅलरीतून दोघांनी लोकसभेच्या सभागृहात उड्या मारल्या. तसंच सोबत आणलेल्या कॅनमधून त्यांनी पिवळा धूरही सोडला. याप्रकरणी विरोधकांनी गृहमंत्री आणि पंतप्रधानांकडून निवेदन सादर करण्याची मागणी केली. त्यावरून १८ डिसेंबर रोजी राज्यसभा आणि लोकसभेतून एकूण ७८ खासदारांना निलंबित करण्यात आलं होतं. १९ डिसेंबर रोजीही ४९ खासदारांवर निलंबनाची कारवाई केली. यावेळी राष्ट्रावादीच्या खासदार सुप्रिया सुळे, अमोल कोल्हे यांनाही निलंबित केलं. आज २१ डिसेंबर रोजीही कॉँग्रेसच्या तीन खासदारांना निलंबित करण्यात आलं आहे. कॉँग्रेसचे लोकसभेतील खासदार डी.के. सुरेश, नकुल नाथ आणि दीपक बैज अशी या निलंबित झालेल्या खासदारांची नावे आहेत. त्यामुळे एकूण निलंबित झालेल्या खासदारांची संख्या आता १४६ झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सभागृहात सुरक्षा भंगाच्या मुद्द्यावरून निवेदन न केल्याने त्यांनी संसदेच्या विशेषाधिकाराचे उल्लंघन केले आहे, असे कॉँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी ठामपणे सांगितले. तसंच विरोधी पक्षाच्या खासदारांच्या निलंबनाच्या निषेधार्थ गुरुवारी, इंडिया आघाडीच्या खासदारांनी संसदेपासून दिल्लीतील विजय चौकापर्यंत मोर्चा काढला. विशेष म्हणजे, खासदारांच्या निलंबनानंतर, संसदेने आज मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्त (नियुक्ती, सेवेच्या अटी आणि पदाचा टर्म) विधेयक, २०२३ मंजूर केले. संसदेने दूरसंचार विधेयक, २०२३ देखील मंजूर केले जे सरकारला राष्ट्रीय सुरक्षेच्या हितासाठी दूरसंचार सेवांवर तात्पुरते नियंत्रण ठेवण्याची आणि उपग्रह स्पेक्ट्रमच्या वाटपासाठी नॉन-लिलाव मार्ग प्रदान करण्याचा प्रयत्न करते.



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

# कामगारांच्या मृत्यूला जबाबदार कोण ?

आधुनिक केसरी

**ना कामाच्या ठिकाणीं सुरक्षितता, ना भरपूर पगाराची व भत्त्याची सुविधा ना राहण्याची व्यवस्था, ना मूलभूत सुविधांची पूर्तता, ना भविष्याची सुरक्षितता, ना आयुष्याची शाश्वती अशा चक्रव्यूहात असंघटित क्षेत्रातील कामगार वर्ग सापडला आहे.पोटाची खडगी भरण्यासाठी व कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठीं कामगारवर्ग दिवस रात्र रा राबतो . शेवटी सुरक्षे अभावी मरण त्याचच होत असते..**

नागपूरजवळील बाजारगाव येथे असलेल्या सोलर एक्सप्लॉसिव्ह कंपनीत स्फोट झाला. या स्फोटात ९ जण ठार, तर ३ जण गंभीर जखमी झाले.या कारखान्यात मोठ्या प्रमाणावर दारुगोळा तसेच रसायने असल्यामुळे यात मोठी जीवितहानी झाली. या स्फोटाची तीव्रता इतकी भयानक होती की मृत देह छिन्न विच्छिन्न झाले..यात एक आई आपल्या मुलीसाठी रोज या कारखान्यात कामाला जात होती.तर काही कामगार आपल्या आई वडिलांचा सहारा होता. तर काही मजुरांच्या घरची हलाखीची की व्यावसायिक क्षेत्रातील टाटा मोटर्स, बजाज ऑटो, मर्सिडीज बेन्झ, फोक्सवॅगन, जनरल मोटर्स, एसकेएफ, ॲटलास कॅप्को, थिसेनक्रुप इंडस्ट्रीज इंडिया, सॅण्डविक एशिया, अल्फा लाव्हल आदी लहान-मोठे उद्योग देशासह राज्यात आहेत.उदा घ्यायचे झाल्यास सहा हजार उद्योग पिंपरी-चिंचवड व चाकण परिसरात आहै या कंपन्यांत लाखो कामगार उदरनिर्वाह करतात. बहुराष्ट्रीय कंपन्यांत काम करीत असताना यंत्रसामग्री व्यवस्थित व सुरक्षेच्या सूचना वाचून त्याचा वापर कसा करावा, याविषयी ब-याचशा कामगारांना इएसआय सुविधा असूनही त्याचा योग्य लाभ मिळत नाही. यामुळे अपघात होऊ नये यासाठी सुरक्षित उपकरणे हाताळणे हे एकमेव उपाय आहे. कामगारांना कंपनीकडून सर्व सुरक्षेच्या साधनांचा पुरवठा होणे गरजेचे असून त्याचा योग्य वापरही होणे गरजेचे आहे. भोसरी एमआयडीसीमध्ये रासायनिक, ज्वालाग्राही,रबर, प्लॅस्टिक, अवजड स्वरूपाच्या अनेक कंपन्यात अनेक कामगार कुठल्याही सुरक्षिततेच्या साधनांशिवाय काम करतात. या कामगारांना मास्क, हेल्मेट, विरोधात गुन्हा दाखल केला असून हलगर्जीपणां व निष्काळजीपणामुळे स्फोट झाल्याचा दावा करण्यात आला आहे अशा स्थितीत स्फोटासाठी कुणाला नेमके जबाबदार ठरविणार की कामगाराची चूक असल्याचा ठपका ठेवण्यात येणार असा प्रश्न उपस्थित होत आहे. केंद्र सरकारने नविन कामगार कायदा केला. या कायद्याने कामगारांना सुरक्षिततेची हमी देण्यात आली आहे.ही जबाबदारी केंद्र,राज्य सरकार प्रमाणेच कंपन्यांची आहे.परंतु हा कायदा देखील कामगारांची सुरक्षा



स्थिती होती.. या सर्व मजुरांचा मृत्यू झाला. होत्याचे नव्हते झाले.

असंघटित क्षेत्रात कामगार दोन वेळच्या अन्नासाठी धडपडत आहे. संघटित कामगारांना संघटनांचा पाठिंबा वेळोवेळी मिळतो व ते आपल्या सुरक्षेचे प्रश्न भक्कमपणे मांडू शकतात पण असंघटित कामगाराला वाली कोण, त्यांच्या अपघाती मृत्यूला कोण जबाबदार, कारखान्यांमध्ये सुरक्षा साधनांच्या पुरवठ्याबाबत नियंत्रण ठेवण्यासाठी कोणती यंत्रणा कारणीभूत, असे अनेक प्रश्न कामगार सुरक्षेबाबत निरुत्तरित आहेत. त्यामुळे औद्योगिक क्षेत्राचा मुख्य कणा असलेला कामगार वगार्ची सुरक्षा रामभरोसेच असल्याचे दिसून येत आहे. मग हे उद्योग औद्योगिक क्षेत्रातले असो प्रशिक्षण दिले जाते. पण लघुउद्योग व छोट्या वर्कशॉपझ्ध्ये चालणा-या कामांमध्ये कामगारवगार्चं सुरक्षेसाठी योग्य साधने पुरवली जात नसल्याने अशा कंपन्यांमध्ये अपघात होतात. बऱ्याचशा कंपनी योग्य प्रशिक्षण व सुरक्षा साधने पुरवतात; पण यंत्रसामग्रीच्या चुकीच्या हाताळणीमुळे अनेक अपघात होताना यापूर्वीच्या काही घटनांमधून दिसून आले आहे. भोसरी, पिंपरी, चिंचवड एमआयडीसी क्षेत्रात हाताची बोटे तुटणे, पाय तुटणे, डोक्याला गंभीर इजा याविषयी होण्याचे प्रकार घडत आहेत. ज्या कामगारांना ईएसआय योजना लागू आहे. त्याच्यासाठी ईएसआय दवाखाने असून, औषध उपचार सोय आहे. इएसआय योजनाही व्यवस्थित राबवली जात नसल्याने गमबुट, गॉगल, हातमोजे, सेफ्टीबेल्ट, सुरक्षा पोशाख अशी सुरक्षेसंबंधातील साधने पुरवणे बंधनकारक आहे. परंतु अनेक कामगार या साधनांशिवाय काम करताना दिसून येतात. त्यामुळेच जीवघेणे अपघात होऊन कामगारांचा जीव जाऊ शकतो.नागपूर येथील कामगारांबाबत निष्काळजीपणा व बेजबाबदारपणा कारणीभूत आहे. स्पोटाचे नेमके कारण अद्याप त्रिसमोर आले नसले तरी कुठे कुठेतरी निष्काळजीपणा व हलगर्जीपणा झाला असावाच. ज्यावेळेस स्फोट झाला त्यावेळी केवळ शिकवू पर्यवेक्षक व कामगार युनिटच्या आत कामाला होते. असा खुलासा समोर आला आहे आश्चर्याची बाब म्हणजे पोलिसांनी अनोळखी व्यक्ती करण्यात अपयशी ठरला आहे.या कायद्याची अंमलबजावणी प्रामाणिक पणे होत नसल्याने नुकसान कामगारांचे होत आहे. या कायद्याने सर्व प्रकारच्या कामगारांसाठी सामाजिक सुरक्षेची हमी मिळते.या तीनही विधेयकांमध्ये राज्यसरकारची भूमिका निर्णायक करण्यात आली आहे त्यांना गरजेप्रमाणे तरतुदींची अंमलबजावणी करायची आहे. नविन कामगार कायद्यात स्थलांतरित मजूर, असंघटित क्षेत्रात काम करणारे सर्व प्रकारचे कामगार यांना या कायद्याच्या कक्षेत आणण्यात आले तरी देखील कामगारांना सुरक्षा देण्यात कंपन्या हलगर्जीपणा करत आहे.त्याचा परिणाम कामगारांना आपला जीव गमवावा लागत आहे.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# असंतुलित मन जीवनात अस्थिरता निर्माण करते

आधुनिक केसरी

**आपलं जीवन संतुलित असलं पाहिजे हि प्रत्येकाची मनोमन इच्छा असते.जीवन संतुलन निर्माण होण्यासाठी आपलं मन हे संतुलित असलं पाहिजे.मन संतुलित ठेवता आलं तर आपोआप जीवन संतुलन निर्माण होतं.मन स्थिर संतुलित असेल तर शरिर स्वास्थ्य आपोआप निरोगी राहते.मनाची अवस्था अस्थिर असेल तर मग मात्र जीवनात अंशांतीच साम्राज्य निर्माण होऊन आपण अस्थिर होतो. शरीरातील अनेक समस्यांच मुळ हे आपल्या मनातील भाव कसा आहे यावरच अवलंबून असत. असंतुलित मन हे अनेक समस्यांना जन्म देत असत.त्याचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रित्या आपल्या आरोग्यावर थेट दुरगामी परिणाम होत असतो.**

निरोगी राहण्यासाठी मन संतुलित आनंदी ठेवलं पाहिजे.आनंद हि जगातील सर्व श्रेष्ठ अशी संपत्ती असून हाच आनंद नित्य सतत दैनंदिन जीवनात टिकवता आला तर दुःख आपल्या आजूबाजूला देखिल फिरकत नाही.जीवन मार्गावर आपल मन हेच आपल्याला वारंवार भरकटवत असतं.जिकडे मन घेऊन जाईल आपण तिकडे धावत असतो पण पोहचत कुठेच नाहीत. मन बुद्धी ही अस्थिर असेल तर अनेक दुःख निर्माण होतात. मन बुद्धी स्थिर असेल तर मग अनेक समस्या आपोआप संपुष्टात येतात. आनंद हि संकल्पना संपत्ती वर आधारीत नसून संतुलित मनाशी व ज्ञानाशी निगडित अवस्था आहे.हिच अवस्था अर्जित करता आली पाहिजे.आनंद हि मनाची निरोगी अवस्था आहे तर चिडचिड हि मनाची रोगी अवस्था आहे. आपण आपल्या मन बुद्धी वर मजबूत पकड निर्माण केली पाहिजे. मन संतुलित असेल तर जगातील कितीही मोठं दुःख नगण्य असत. मुळात दुःख हि कल्पना आहे.जीवनात ठरवुन काही घडत नाही.जन्माला येताना कोणाचही भविष्य हे निश्चित नसतं. अथवा पुढील क्षणाला काय घडेल हे देखील कोणालाही सांगता येत नाही. तसं ते बदलता देखिल येत नाही. हे सगळं सत्य महित असताना देखिल त्या विषयी आपण व्यर्थ चिंता करतो. त्याचे पुढे अनेक मानसिक आजारात रूपांतर होत असते.मोह माया,स्वार्थ,हा भौतिक चक्रव्युह आहे हा चक्रव्यूह भेदता आला पाहिजे.हा चक्रव्यूह भेदण्यासाठी मनांचा संतुलन साधता आल पाहिजे. ज्ञान समजुन घेऊन सत्य स्वीकारलं पाहिजे. संतुलित मन निरर्थक बाबींना बळ देऊन खतपाणी देखिल घालत नाही. असंतुलित मन सतत चिंतेत असत.चिंता हि चिडचिडेपणाची जननी आहे.वर्तमान काळातील घटनांच्या अनुषंगाने भविष्यातील चिंता करण आवश्यक नसत. नेमकं आपण तेच करतो.मग नको ते केल्या नंतर परिणाम पण तसेच येतील. यामध्ये शंका नाही.गरीब अथवा श्रीमंत या दोन्ही वर्गाच्या वाट्याला एक समान समस्या निर्माण करत ते असंतुलित मन असतं. समस्येवर एकमेव उपाय म्हणजे संतुलित मन असून स्वतःच्या ज्ञान सामर्थ्यवर उभा राहता आलं पाहिजे स्वतःच्या ज्ञान सामर्थ्यवर उभा राहणाराला कोणत्याही परिस्थितीत अडचण निर्माण होत नाही. जन्माला येताना आपण स्वतः एकटे आलो आहेत.जाताना पण एकटेच जाणार आहेत या मध्ये काही शंका नाही हि बाब समजली पाहिजे.आपला जीवन प्रवास किती आहे हे देखिल माहिती नसत हे अगदी सुर्य प्रकाशा एवढं स्वच्छ सत्य आहे. मग एवढं मोठं सत्य महित असताना जन्म आणि मृत्यू या मधील कालावधी आपण व्यवस्थित घातला पाहिजे. वास्तवात तसं होत नाही. अनेक क्षणिक अपेक्षा आभासी अस्तित्व या चक्रव्यूहात आपण असे काही अडकतो कि यामधून बाहेर पडता येत नाही अस्थिर मन ह्या अवस्थेला कारणीभूत असतं. याची परिणीती म्हणजे ताण तणाव निर्माण होऊन अनेक आजारांना आपण आमंत्रण देतो.जीवनात आपण स्वतःला असुरक्षित का समजतो हाच खुप मोठा प्रश्न आहे स्वतःला असुरक्षित समजणं हिच खरी असंतुलित मनाची पायाभरणी असून आयुष्याची दुरवस्था होण्याची सुरवात असते अपेक्षा आणि फल प्राप्ती मधील अंतर पचवता आलं पाहिजे. त्यासाठी संतुलित मन गरजेचे आहे.हेच अंतर कधी कधी पचवता येत नाही. मुळात जीवन हितार्थ हे अंतर पचवायला शिकलं पाहिजे. पण हे अंतर पचवता येत नसल्याने ताण निर्माण होतो. जीवन आहे म्हणजे दुःख आहे हे सगळं खरं आहे. क्षणभंगुर आयुष्यात जे काही मिळालं ते खुप आहे हे मान्य करण्याची मानसिकता कमी होत चालली म्हणजेच मन संतुलन कमी पडत चालेल आहे.या उलट प्रचंड हव्यास मात्र वाढत चालला आहे या विचित्र स्थिती ने वैचारिक गोंधळ निर्माण होतो.आपल्याकड प्रचंड ज्ञान असलं पाहिजे.आपल्या कड ज्ञानाच बळ असेल तर जीवनात कोणत्याही प्रकारचा दुःख आपलं काहिच बिघडवू शकत नाही.म्हणून आपलं ज्ञान हिच आपली सुरक्षितता असते.मन संतुलन हेच जीवन संतुलन असतं.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# शायद मेरी शादी का खयाल दिल में आया है

आधुनिक केसरी

**सावन कुमार टाक यांनी निर्माण व दिग्दर्शित केलेल्या `सौतन' (१९८३) या चित्रपटात राजेश खन्ना, टिना मुनीम (अंबानी) आणि पद्मिनी कोल्हापुरे तीन प्रमुख भूमिकांमधे झळकले. यातील रुक्मणीची भूमिका सुरुवातीला झीनत अमान आणि परवीन बाबी यांना देऊ करण्यात आली होती; पण दोघींनीही नकार दिल्याने भूमिका टिना मुनीमकडे गेली. `सौतन' हा मॉरिशस या देशात चित्रित झालेला पहिला वहिला हिंदी चित्रपट ठरला. तो चांगला चालला आणि त्याने राजेश खन्ना यांच्या `सुपर स्टार'च्या दर्जात भरच घातली. या चित्रपटात प्राण, प्रेम चोपडा, डॉ. श्रीराम लागू, शशिकला, विजय अरोडा, सत्येन कप्पू, रूपेश कुमार, सुधीर दळवी, हरबन्स दर्शन, टी. पी. जैन, युनुस परवेझ, परेश रावळ, नितीन सेठी आदी सहकलाकार होते. गीते स्वत: सावन कुमार टाक यांनीच लिहिली होती आणि संगीत उषा खन्ना यांनी दिले होते.**




या चित्रपटात दाखविल्याप्रमाणे श्याम मोहित (राजेश खन्ना) हा भारतीय तरुण मॉरिशसमधे नोकरी करत असतो. रायसाहेब पाशा (प्राण) या श्रीमंत उद्योगपतीची एकुलती एक कन्या रुक्मणीशी (टिना मुनीम) त्याचा परिचय होतो. दोघे एकमेकांच्या प्रेमात पडतात. रुक्मणीची सावत्र आई रेणू (शशिकला) आणि भाऊ संपतलाल (प्रेम चोपडा) यांचा विरोध डावलून दोघे विवाहबद्ध होतात. रुक्मणी सुशिक्षित आणि आधुनिक दृष्टिकोन ठेवणारी असूनही श्यामशी मनमोकळेपणाने वागणारे गोपाल (डॉ. श्रीराम लागू) आणि त्यांची कन्या राधा (पद्मिनी कोल्हापुरे) यांच्याशी पूर्वग्रहदूषित असल्यासारखी वागत असते. श्यामला पिता व्हायचे असते पण रुक्मणी गर्भधारणा होऊ नये म्हणून शस्त्रक्रिया करून घेते आणि स्वतःची काळजी घेण्याकडे दुर्लक्ष करते. परिणामी शारीरिक गुंतागुंत वाढून ती आई बनू शकणार नाही अशी परिस्थिती निर्माण होते. श्याम आणि रुक्मणी यांच्यांत यामुळे दुरावा निर्माण होतो. दुखावल्या गेलेल्या रुक्मणीला श्याम आणि राधा एकमेकांत गुंतले असल्याचे कळते. ती श्यामला अगदी तुरुंगात पाठवावे लागले तरी बेहत्तर अशा पद्धतीने सूड उगवण्याचे ठरवते. त्यात ती यशस्वी होते का, याचा उलगडा अखेरीस होतो. या चित्रपटातील "शायद मेरी शादी का खयाल दिल में आया है" हे लता मंगेशकर व किशोर कुमार यांनी गायिलेले आणि श्याम (राजेश खन्ना) व रुक्मणी (टिना मुनीम) यांच्यावर चित्रित झालेले द्वंद्वगीत चित्रपटाचे प्रमुख आकर्षण ठरले होते. त्याची शब्दरचना साधीच असली तरी नेहमीच्या प्रेमगीतापेक्षा किंचित वेगळी आहे आणि म्हणून ऐकायला छान वाटते. माझ्या आईच्या मनात कदाचित माझ्या लग्नाचा विचार आला असावा म्हणून तिने तुला घरी चहापानासाठी बोलावलेय, असे प्रेयसी प्रियकराला सांगत्येय; तर तो म्हणतोय, मला स्वच्छंदीपणे वागताना पाहूनच हे जाळे पसरून मला चहाला बोलावलेले दिसतेय ! ती म्हणते, माझ्या घरी येऊन तू जराही न लाजता माझा हात माग. त्यावर तो म्हणतो, तू भर दिवसा उन्हात तारे पाहते आहेस की काय ? असे मजेशीर गीत आहे. लता मंगेशकर आणि किशोर कुमार या कसलेल्या पार्श्वगायकांनी ते चांगले खुलविले आहे. संगीत दिग्दर्शिका उषा खन्ना यांची चाल चटकन लोकप्रिय व्हावी अशीच आहे. तीत बोंगो, मेंडोलिन, ग्रुप व्हायोलिन यांचा वापर केला आहे. या गीताच्या ओळी पुढीलप्रमाणे :

अनिल तोरणे
तळेगाव दाभाडे, पुणे

**शायद मेरी शादी का खयाल दिल में आया है
इसीलिए मम्मी ने मेरी तुम्हें चाय पे बुलाया है
पंछी अकेला देख मुझे ये जाल बिछाया है
इसीलिए मम्मी ने तेरी मुझे चाय पे बुलाया है
ठीक तुम चार बजे घर चले आना
मेरा हाथ मांग लेना जरा न शरमाना
सात फेरे मेरे संग सपने देख रही हो
खिली हुई धूप में तारे देख रही हो
अरे नहीं नहीं बाबा चाय नहीं पीना
तौबा मेरी तौबा माफ कर देना
इन्हीं अदाओं पर तो हाय अपना दिल आया है
दिल्लगी न करो छेडो न हमको सनम
हाँ कहो घर चलो तुमको मेरी कसम
जान ए मन माना हम तुम पे मरते हैं
प्यार तो ठीक है शादी से डरते हैं
शादी से पहले तो सब अच्छा लगता है
सारी उम्र को फिर रोना पडता है**

# श्रीमद् भगवद्गीता : धर्मज्ञानाचा कोष!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**समग्र महाभारताचे नवनीत व्यासांनी भगवद्गीतेत दिले आहे. गीता ही व्यासांची मुख्य शिकवण आणि त्यांच्या मननाची संपूर्ण साठवण आहे. प्राचीन काळापासून गीतेला उपनिषदाचा दर्जा मिळाला आहे. गीता उपनिषदांचेही उपनिषद आहे. गीतारूपी अमृत भगवंतांनी धनुर्धर अर्जुनाच्या निमित्ताने जगाला दिले आहे. जीवनाच्या विकासाला आवश्यक असलेला प्रत्येक प्रायः विचार गीतेत आहे. म्हणूनच गीता हा धर्मज्ञानाचा कोष आहे. मार्गशीर्ष शुक्ल एकादशी हा भगवद् गीतेच्या जयंतीचा दिवस म्हणून साजरा होतो.**

सुमारे ५ हजार वर्षांपूर्वी ज्या दिवशी रणभूमीवर श्रीकृष्णाने धनुर्धारी अर्जुनाला जीवनविषयक संदेश दिला, तो मार्गशीर्ष मासातील हा दिवस गीता जयंती म्हणून ओळखला जातो. तो दिवस म्हणजे भारतीय जीवनात श्रेष्ठतम म्हणावा लागेल. विश्वातील लोक भावपूर्ण अंतःकरणाने गीताजयंतीचा उत्सव दरवर्षी भक्तिभावाने साजरा करतात. एखाद्या ग्रंथाचा जन्मदिवस साजरा करणे, ही कदाचित अखिल विश्वात गीतेची आगळीवेगळी विशेषतः आणि महानता प्रकर्षाने दिसून येते, म्हणूनच थोर संत विनोबाजींनी गीतेसंबंधी म्हटले आहे की, "माझे शरीर आईच्या दुधावर पोसले; त्यापेक्षाही माझे हृदय व बुद्धी यांचे गीतेच्या दुधावर अधिक पोषण झाले आहे. गीता माझे प्राणतत्त्व होय!"

**"नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः||
न चैनं क्लेदन्त्यापो न शोषयति मारुतः||"
(पवित्र श्रीमद्भग्वद्गीताः अध्याय- २:
श्लोक- २३)**

[भावार्थः यांना- आत्मा व परमात्मा यांना शस्त्रे तोड़ नाहीत, अग्नी जाळू शकत नाही. तसेच पाणी भिजवत नाही अथवा वायू सुकवित नाही.) याचा अर्थ असा की, आत्मा आणि परमात्मा अजरामर आहेत. त्यांच्यावर पंचमहाभूतांचा कोणताच प्रभाव पडू शकत नाही. म्हणून आपला आत्मा परमात्म्याशी तादात्म्य पावला पाहिजे, तो आत्म्यात विलीन होणे, मानवाच्या ब्रह्मज्ञान प्राप्तीनेच संभव आहे. समग्र महाभारताचे नवनीत व्यासांनी भगवद्गीतेत दिले आहे. गीता ही व्यासांची मुख्य शिकवण आणि त्यांच्या मननाची संपूर्ण साठवण आहे. प्राचीन काळापासून गीतेला उपनिषदाचा दर्जा मिळाला आहे. गीता उपनिषदांचेही उपनिषद आहे. गीतारूपी अमृत भगवंतांनी धनुर्धर अर्जुनाच्या निमित्ताने जगाला दिले आहे. जीवनाच्या विकासाला आवश्यक असलेला प्रायः प्रत्येक विचार गीतेत आहे. म्हणूनच गीता हा धर्मज्ञानाचा कोष आहे. हजारो वर्षांपासून ते आजपर्यंत ऋषी, साधू, संत, भक्त, चिंतक, योगी, कर्मवीर, ज्ञानी मग तो कोणत्याही देशातील, भूप्रदेशातील, काळातील असो कोणत्याही धर्माचा, जातीचा, पंथाचा असो, त्या सर्वांना गीतेतील अवीट माधुर्याने आणि सौंदर्याने मुग्ध केले आहे. गीतेने मानव समाजाला जगण्याची हिंमत आणि तेज दिले. जीवनाचा पुरुषार्थ दाखविला आहे. भगवंतांनी अर्जुनाला निमित्तमात्र बनवून विश्वातील समग्र मानव जातीला गीता ज्ञानाद्वारे जीवनाभिमुख करण्याचा चिरंतन मार्ग दाखवला आहे. पांडुरंगशास्त्री आठवले यांनी गीतेसंबंधी म्हटले आहे की, "वेद, उपनिषदे यांचा महान ज्ञानसागर गीतेने स्वतःच्या लहानशा घागरीत सामावून घेतलेला आहे. गीता ही सर्व शास्त्रमयी आहे. गीतेत सर्व शास्त्रांचा समन्वय पहायला मिळतो. गीता हा वैश्विक ग्रंथ आहे. गीता हा आमचा विश्व धर्मग्रंथ आहे. साहित्य शौकिनांची लालसा गीता पूर्ण करते. कर्मवीरांना गीता उत्साह देते. भक्तांना गीतेत भक्तीचे रहस्य आढळते. व्याकरणकारांचे हृदय गीतेतील शब्दांचे लालित्य पाहून डोलू लागते." पांडुरंगशास्त्री पुढे सांगतात की, निराशावादी मनुष्य गुलाबावरील काटे पाहतो, गीता त्याला काट्यांमध्ये गुलाब पाहण्याची दृष्टी देते. गीतेने मनुष्यमात्राला यशस्वी, सुखी, शांत आणि तृप्त जीवनाचा शाश्वत मार्ग दाखविला आहे. गीता म्हणजे भारताच्या गौरवाची शान आहे. गीता जगाकडे व जीवन मार्गाकडे पाहण्याची मूलभूत अध्यात्मपर दृष्टी देणारा ग्रंथ आहे.

**"यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न काङ्क्षति ।
शुभाशुभपरित्यागी भक्तिमान्यः स मे प्रियः॥"
[पवित्र श्रीमद्भग्वद्गीताः अध्याय- १२:
श्लोक- १७वा.]**

(भावार्थ : असा मनुष्य जो कधी अत्यानंदित होत नाही, द्वेष करत नाही, शोक करत नाही आणि जो कधी कामना करत नाही. तसेच शुभ आणि अशुभ संपूर्ण कर्मांचा त्याग करतो. तोच भक्तियुक्त भक्त मला अतिप्रिय आहे.) याचा अर्थ असा की, एखादे कार्य मनाप्रमाणे पार पडल्यानंतर अति आनंदीत होता कामा नये. अशाने चूक होण्याची शक्यता अधिक असते. तसेच आपले कार्य यशस्वी ठरले म्हणून कोणाचा द्वेष आणि ईर्ष्याही करू नये. मानसिक शांतता आणि प्रसन्नता ठेवण्यास याचा उपयोग होऊ शकतो, असे सांगितले जाते. आपला स्वधर्म जाणणे आणि प्राणांतीही तो न टाकणे ही एक मनाची घडण आहे. आपल्या प्राणप्रिय देशाच्या स्वातंत्र्यासाठी झुंजलेले वीर, क्रांतिकारक देशभक्त, गीता हृदयाशी धरून फासावर चढले, याचाच अर्थ असा की, मृत्यूलाही हसतमुखाने सामोरे जाण्याचे आत्मिक आणि मानसिक बळ, शक्ती गीतेने दिली. लोकमान्य टिळक, योगी अरविंद, महात्मा गांधी या थोर राष्ट्रीय नेत्यांनी गीतेवर चिंतन केले आहे. विद्या प्राप्त करावयाची असेल तर माणसांमध्ये विनम्रता, जिज्ञासा आणि सेवावृत्ती या तीन गोष्टी असल्या पाहिजेत, असा जीवनाला दृष्टी देणारा संदेश गीतेने जगाला दिला आहे.

भारतीय तत्त्वज्ञान हे कालातीत आहे. देशात अनेक धर्म, जाती, पंथाचे नागरिक अगदी गुण्यागोविंदाने नांदतात. प्रत्येक धर्मात सांगितलेले तत्त्वज्ञान अतिशय मोलाचे असल्याचे पाहायला मिळते. भारतीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी अगदी कानाकोपऱ्यातून संशोधक, अभ्यासक, विचारवंत देशात येत असतात. देशातील अनेक प्रमुख ग्रंथांमध्ये वरचे स्थान असलेला ग्रंथ म्हणजे भगवद्गीता. गीतेतील शिकवण ही कालातीत असून, आजच्या काळातही गीताज्ञान किती अमोघ, अनमोल आणि अमूल्य वाटते, याची प्रचिती अनेकांना येत असते. हजारो वर्षे लोटली तरी, गीताज्ञानाची महती, उत्सुकता, महत्त्व कमी होताना दिसत नाही. आजच्या काळातही अनेक विचारवंत, तत्त्वज्ञ गीतेवर संशोधन करताना दिसतात. गीतेवर देशभरात अनेक अन्य ग्रंथ, टीका ग्रंथ रचण्यात आले. यावरूनही गीतेची थोरवी अधोरेखित होते, असे सांगितले जाते. कलियुगातही गीता तितकीच महत्त्वाची असल्याचे दिसून येते. सुखी आणि आनंदी जीवनासाठी गीतेतील काही उपदेश अत्यंत उपयुक्त असल्याचे म्हटले जाते. नेमके काय म्हटलेय गीतेत? जाणून घेऊया...

**"कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।
मा कर्मफलहेतुर्भुर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि॥"
(पवित्र श्रीमद्भग्वद्गीताः अध्याय- २:
श्लोक- ४७.)**

[भावार्थ : तुझा अधिकार केवळ कर्म करण्याचा आहे. त्याच्या फळांवर नाही; म्हणून तुझा कर्म करण्याचा उद्देश फळप्राप्ती हा नको; पण, कर्म न करण्यामध्येही तुझी आसक्ती नको.] याचा अर्थ असा की, मनुष्याने भविष्याची चिंता सोडून केवळ वर्तमानातील आपल्या कर्मावर लक्ष केंद्रीत करावे. वर्तमानात मेहनत, परिश्रम घेतले, तरच भविष्यात सुफलप्राप्ती होईल. म्हणजेच आता काम केल्यास भविष्यात सुखी, समाधानी, आनंदी जीवन जगता येणे शक्य होऊ शकते, असे म्हणतात.

महाभारतात जेव्हा कौरव हे पांडवांना फसवतात आणि त्यांना त्यांचा वाटा देत नाहीत, तेव्हा महाभारताचे युद्ध सुरू होते. कुरुक्षेत्रात एका बाजूला कौरव आणि दुसरीकडे पांडव होतात. पण आपले भाऊ, शिक्षक, आजोबा बघून अर्जुन त्यांना मारण्याचा धाडस करत नाही. तेव्हा भगवान श्रीकृष्ण त्यांना त्यांच्या विशाल रूपाची ओळख करून देतात आणि संपूर्ण सृष्टीला गीतेचे अनमोल ज्ञान देतात. हिंदू दिनदर्शिकेनुसार तो दिवस मार्गशीर्ष महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशी तिथी होता. त्यामुळे दरवर्षी या तिथीला गीता जयंती साजरी करून गीतेचे अनमोल ज्ञान जीवनात आणण्याचा प्रयत्न केला जातो. गीता जयंती आज शुक्रवार दि.२२ डिसेंबर २०२३ रोजी गीता जयंती साजरी केली जाईल. गीता जयंती हा हिंदूंचा पवित्र ग्रंथ श्रीमद् भगवद्गीता यांचा जन्म आहे. यंदा गीताची ५१६०वी जयंती आहे. या दिवशी गीता, भगवान श्रीकृष्ण आणि वेद व्यासजींची पूजा करून हा उत्सव साजरा केला जातो.

**"एतां विभूतिं योगं च मम यो वेत्ति तत्त्वतः।
सोऽविकम्पेन योगेन युज्यते नात्र संशयः॥"
(पवित्र श्रीमद्भग्वद्गीतीः अध्याय- १०:
श्लोक- ७वा.)**

[भावार्थ : जो मनुष्य माझ्या परमेश्वर स्वरुपाचे आणि योगशक्तीचे तत्त्व जाणतो, तो निश्चल भक्तियोग युक्त होतो. यात कोणतीही शंका नाही.] याचाच अर्थ असा आहे की, जो मनुष्य ईश्वरी शक्तीचा मनापासून स्वीकार करतो आणि परमात्म्यावर संपूर्ण श्रद्धा ठेवतो. भगवंत त्याचे कधीही वाईट होऊ देत नाही, असे सांगितले जाते.

**"न हि देहभृता शक्यं त्यक्तुं कर्माण्यशेषतः|
यस्तु कर्मफलत्यागी स त्यागीत्यभिधीयते||"
(पवित्र श्रीमद्भग्वद्गीताः अध्याय- १८:
श्लोक- ११वा.)**

[भावार्थः कारण देहधारी प्राण्याला कर्माचा पूर्णपपणे त्याग करणे शक्य नाही. म्हणून जो कोणी कर्माच्या फलाचा त्याग करतो, त्यालाच खरा त्यागी म्हणजे संन्यासी म्हटले आहे.] याचाच अर्थ असा की, पृथ्वीवर जन्म घेतल्यानंतर मनुष्य कोणते ना कोणते कार्य करण्यासाठी बांधील आहे. प्रत्येक व्यक्तीचे काहीतरी वैशिष्ट्य, वेगळेपण असते. आपल्यातील प्रतिभा ओळखून कार्य करत राहणे उपयुक्त ठरते. आवडीच्या कामाचा आनंद मिळतो आणि यश व प्रगतीचे मार्ग प्रशस्तही होऊ शकतात. मात्र त्या कर्मातून मला नेमके तेच फळ मिळायला हवे होते, ही भावना नको. पर्यायाने सुख आणि आनंदाची अनुभूती मनुष्य घेऊ शकतो, असे सांगितले जाते.

**"कर्मेन्द्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन्।
इन्द्रियार्थान्विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते॥"
[पवित्र श्रीमद्भग्वद्गीताः अध्याय- ३राः
श्लोक- ६वा.]**

(भावार्थ : मनुष्य हा वरवर इंद्रियांवर नियंत्रण मिळवल्यासारखे भासवत असतो. मात्र, मनातून तो त्यांचेच चिंतन करत असतो वा त्या विषयी विचार करतो, तो दांभिक मानला जातो.) याचा अर्थ असा की, दिखाऊपणा करणारा व्यक्ती असत्यवचनी आणि कपटी असल्याचे म्हटले जाते. खऱ्या अर्थाने इंद्रियांवर नियंत्रण मिळण्याची कला अवगत करता आली पाहिजे. इंद्रियांवर नियंत्रण म्हणजे अपेक्षा, आशा, इच्छा, आसक्ती यांच्यावर नियंत्रण मिळवणे होय. असे केल्याने समाधान, खऱ्या, निखळ आनंदाची अनुभूती घेणे शक्य होऊ शकते, असे सांगितले जाते.

गीता जयंतीला मोक्षदा स्मार्त एकादशी असेही म्हणतात. मोक्षदा एकादशीचे व्रत गीता जयंतीच्या दिवशीच ठेवले जाते. या दिवशी भगवान विष्णूची पूजा केली जाते आणि मोक्षदा एकादशी व्रताची कथा ऐकली जाते. त्याच्या पुण्यप्रद फळाने मनुष्याला मृत्यूनंतर मोक्ष प्राप्त होतो, अशी समजूत रुढ आहे. भगवान श्रीकृष्णाने गीतेद्वारे मानवाला त्याच्या कर्माची जाणीव करून दिली आहे. गीतेमध्ये एकूण १८ अध्याय आहेत, ज्यामध्ये कर्म, भक्ती आणि ज्ञानयोग यांचे तपशीलवार वर्णन केले आहे. भ.श्रीकृष्णजींनी अर्जुनाला माध्यम बनवून मानवाला उदात्त जीवन जगण्याचा मार्ग दाखवला आहे. वर्तमानात जगणे आणि फळाशिवाय कर्म करणे हे माणसाच्या ताब्यात असते. आत्मा अमर आहे, शरीर नश्वर आहे. शरीराशी संलग्न होऊ नका, आत्मा शुद्ध करा आणि मोक्षाचे ध्येय ठेवा. जशा अनेक मौल्यवान शिकवणी गीतेत आहेत. सदर ग्रंथराज म्हणजेच आध्यात्मिक क्रांतीचा अनमोल ठेवा आहे, हे येथे उल्लेखनीयच!




# हरेगावला महामानवाचा पदस्पर्श

आधुनिक केसरी

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अहमदनगरला अनेकदा भेटी दिल्या. परंतु 16 डिसेंबर 1939 रोजी त्यांनी श्रीरामपूरच्या हरेगावला दिलेली भेट अनेक दृष्टीने ऐतिहासिक ठरली. वतनदार महार, मांग बेठिया परिषदेत ओजस्वी भाषण दिले. इंग्रज अधिकाऱ्याने जेवणाचे दिलेले निमंत्रण नाकारून सामान्य कार्यकर्त्याचा चंद्रमौळी झोपडीला भेट दिली. बाबासाहेबांच्या पावन स्मृतीला अभिवादन म्हणून हरेगाववासी हा दिवस दरवर्षी 'स्वाभिमान दिवस' म्हणून मोठ्या उत्साहाने साजरा करतात. डॉ. बाबासाहेब आबेडकरांनी महारांना वतनाच्या गुलामगिरीतून मुक्त करण्याचा कायदेशीर प्रयत्न 1937च्या कायदेमंडळात केला.**

महारांची कामे निश्‍चित ठरवावीत आणि त्यांना त्याबद्दल भरपूर पगार देण्यात यावा ही या बिलाची दोन वैशिष्ट्ये होती. या बिलाला सरकारचा व सभासदांचा पाठिंबा मिळाला नाही म्हणून ते बिल बाबासाहेबांनी परत घेतले. सरकारने 1939 साली महारकी व हडाळकी या वतनदार महारांच्या वतनी जमिनीवरील जुडीच्या दरात वाढ केली होती. या मामुली साऱ्याला 'जुडी' हे नाव होते. या सारावाढीला विरोध दर्शविण्यासाठी शेकडो ठिकाणी सभा झाल्या त्यापैकी हरेगाव, ता. श्रीरामपूर, जि. नगर या ठिकाणी 16 डिसेंबर 1939 रोजी झालेली 'वतनदार महार बेठिया परिषद' ही एक प्रमुख सभा होय. विश्‍वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर या परिषदेला आवर्जून उपस्थित होते. परिषदेचे अध्यक्ष आणि स्वागताध्यक्ष नाशिकचे भाऊराव गायकवाड होते. बाबासाहेबांचे हे भाषण 'दलित बंधू' ( 29 / 2 / 1940 ) च्या अंकात प्रसिद्ध झाले होते. स्वतंत्र मजूर पक्षातर्फे आयोजित परिषदेला मार्गदर्शन कण्यासाठी बाबासाहेबांचे 16 डिसेंबरला सायंकाळी साडे पाच वाजता मोटारीने गावात आगमन झाले. त्यांच्या मोटारीसमोर डीएसपीची गाडी होती. पाठीमागे अंगरक्षक तैनात होते. ताफा कारखान्याजवळील पोस्ट ऑफिसजवळ थांबला.

बाबासाहेबांचे भाषण ऐकण्यासाठी गावागावातून हजारो कार्यकर्ते आले होते. याप्रसंगी दिलेल्या भाषणात बाबासाहेब म्हणाले, "आजची परिषद महार, मांग व बेठिया यांच्या वतनांचा विचार करण्यासाठी बोलाविण्यात आली आहे. या वतनदारांचे पहिले गाऱ्हाणे म्हणजे सरकारने अन्यायाने सुरू केलेली 'जुडीवाद' हे होय. त्यांना मोबदला न देता त्यांच्या जमिनी जप्त करण्यात आल्या आहेत. जप्त केलेल्या जमिनीच्या किंमतीवरील व्याज त्यांना देणेही सरकारने आता बंद केले आहे. या वतनदारांना त्यांच्यावर लादलेल्या कामाबद्दल मिळणारा मोबदला अपुरा असून त्यांना जी नगद रक्कम देण्यात येते ती सुद्धा अलीकडे बंद करून त्यांचेवर आणखी एक अन्यायाचे ओझे लादण्यात आले आहे. अशा रीतीने या दारिद्र्यात खितपत पडलेल्या लोकांची चारही बाजूने पिळवणूक करण्यात येत असून त्यांच्या दारिद्र्यात भर टाकण्यात आली आहे. या ऐतिहासिक परिषदेचे साक्षीदार होण्याचे सद्भाग्य हरेगावातील फकिरराव केरुजी गायकवाड



यांना लाभले होते. सभा संपल्यानंतर फॅक्टरीचे मॅनेजर गोराई रूपेन यांनी बाबासाहेबांना भोजनाचे निमंत्रण दिले होते. मात्र बाबासाहेबांनी ते निमंत्रण नाकारून निष्ठावान, ध्येयवादी अन् स्वाभिमानी फकिरावांच्या चंद्रमौळी झोपडीला भेट दिली. संत तेरेसा चर्चजवळ असलेल्या फकिररावांच्या वडिलांनी घरातून आणलेल्या ताडपत्रीवर बाबासाहेब बसले होते. नंतर फकिररावांनी घरातून आणलेला पलंग त्यांना बसण्यासाठी ठेवण्यात आला. त्यावेळी बोर, गाजर आणि इतर फळे त्यांना तांब्याच्या भांड्यात स्वच्छ करून देण्यात आली. ती त्यांनी आवडीने खाल्ली होती. त्यानंतर बाबासाहेब आपल्या ताफ्यासह निघून गेले. बाबासाहेबांची ही अविस्मरणीय आठवण फकिरराव आयुष्यभर विसरले नाही. काळजावर कोरून ठेवली. एवढेच नव्हे तर ज्या पलंगावर महामानव क्षणभर विसावले तो पलंग त्यांनी मौल्यवान अलंकाराप्रमाणे शेवटच्या श्‍वासापर्यंत जतन केला. 'महामानवाच्या पदस्पर्शाने माझी झोपडी पावन झाली त्यातच माझ्या जीवनाचे सार्थक झाले असे मार्मिक उद्गार फकिरराव नेहमी काढायचे. दोनच महिन्यापूर्वी हा निष्ठावंत कार्यकर्ता बाबासाहेबांचे स्मृतिचिन्ह पलंगाच्या रूपाने मागे ठेवून जगाला पारखा झाला. तो पलंग आणि इतर महत्त्वपूर्ण वस्तू फकिररावांच्या मुलीने आपल्या वैजापूरच्या राहत्या घरी जतन केला आहे.

बाबासाहेबांचे ज्या ठिकाणी भाषण झाले त्या ठिकाणी हरेगाववासीयांनी बाबासाहेबांचे स्मारक म्हणून 27 मार्च 1983 रोजी भव्य पुर्णाकृती पुतळा उभारला. या पुतळ्याचे अनावरण श्रीमती डॉ. सविता उर्फ माईसाहेब आंबेडकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या दिमाखदार सोहळ्याचे अध्यक्षपद सुप्रसिद्ध साहित्यिक मा. डॉ. गंगाधर पानतावणे यांनी भूषविले होते. पुतळा लोकवर्गणीतून उभारण्यात आला. पुतळा उभारण्यासाठी तत्कालीन सरपंच बाबुराव तानाजी शिंगारे यांनी पुढाकार घेतला होता. शिंगारे यांची बाबासाहेबांप्रती असलेली निष्ठा पाहून गावकऱ्यांनी, बेलापूर कंपनी आणि शेती महामंडळ हरेगाव मळा यांनी मोलाची मदत केली होती.बाबासाहेबांचे ज्या ठिकाणी भाषण झाले त्या ठिकाणी हरेगाववासीयांनी बाबासाहेबांचे स्मारक म्हणून 27 मार्च 1983 रोजी भव्य पुर्णाकृती पुतळा उभारला. या पुतळ्याचे अनावरण श्रीमती डॉ. सविता उर्फ माईसाहेब आंबेडकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या दिमाखदार सोहळ्याचे अध्यक्षपद सुप्रसिद्ध साहित्यिक मा. डॉ. गंगाधर पानतावणे यांनी भूषविले होते. पुतळा लोकवर्गणीतून उभारण्यात आला. पुतळा उभारण्यासाठी तत्कालीन सरपंच बाबुराव तानाजी शिंगारे यांनी पुढाकार घेतला होता. शिंगारे यांची बाबासाहेबांप्रती असलेली निष्ठा पाहून गावकऱ्यांनी, बेलापूर कंपनी आणि शेती महामंडळ हरेगाव मळा यांनी मोलाची मदत केली होती.

हरेगावला 'बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया'तर्फे आदरणीय महाउपासिका मीराताई आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकतीच 14वी स्वाभिमान धम्म परिषद अपार उत्साहाने पार पडली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय ट्रस्टीचे अध्यक्ष ॲड. हरीश रावलिया होते. राष्ट्रीय कार्याध्यक्ष कोपरगावचे पूज्य भदन्त कश्यपजी यांनी उपस्थितांना मौलिक मार्गदर्शन केले. वसंत पराड सर, राजेश पवार, अशोक केदारे, महाराष्ट्र राज्य पर्यटन विभागाचे उपाध्यक्ष डी. सी. सोनवणे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले. यावेळी पराड सरांनी बाबासाहेबांनी हरेगावला दिलेल्या भाषणाची प्रत सर्व पदाधिकाऱ्यांना वाटली. कार्यक्रमाला महिला, समता सैनिक दलाचे उपासक - उपासिका हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

मिलिंद मानकर, नागपूर
8080335096

# हा खेळ विचित्र स्वभावाच्या माणसांचा...



बबन गुळवे
मुंबई. मो.९७३०९३९७३२

आधुनिक केसरी

**सकाळचे सात वाजले आहेत. कोवळ्या उन्हात सृष्टी उजाळून निघाली आहे. पक्षांचा किलबिलाट जणू सकाळची मंजूळ गाणीच. झोपेतून जागे झालेले लोक सकाळची कामे करत आहेत आणि गाढ झोपेत असलेले लोक घोरत आहेत. ऐंशी वर्षे वयाचे श्यामराव मुखमार्जन करुन चहा येण्याची वाट पहात आहेत.परंतु त्यांची सुनबाई अजुनही झोप काढत आहे. थोडावेळ वाट पाहून श्यामराव घराच्या बाहेर आले आणि तेथून जवळच असलेल्या बस स्टँडकडे निघाले. तेथे पोहचल्यानंतर ते एका चहाच्या हॉटेलमध्ये गेले. चहाची ऑर्डर दिली. वेटरने त्यांना चहा दिला.**

गरमागरम चहाचे झुरके मारत श्यामराव विचारांत हरवून गेले.दोन वर्षांपुर्वी त्यांच्या पत्नीचे कॅंसरने निधन झाले आहे.त्यांचा एकुलता एक मुलगा गावाच्या शेजारी असलेल्या साखर कारखान्यात नोकरीला आहे.तो त्यांच्याशी फारसा बोलत नाही. त्याची पत्नी म्हणजे श्यामराव यांची सुनबाई तोंडाने फटकळ. संस्कार म्हणजे काय हे तिला माहीत नाही.रात्री उशिरापर्यंत टि.व्ही. पहाते व सकाळी उशिरा उठते. घरकामांत आळशी व कामचुकार.त्याचा परिणाम असा की श्यामरावांना ना वेळेवर चहा ना वेळेवर जेवण. बिच्चारे जीव मुठीत धरून उरलंसुरलं जीवन जगत आहेत. एकदा दोनदा तर तिने श्यामरावांचा पानउतारा केला होता ते ही क्षुल्लक कारणावरून... दत्तप्रसाद सरकारी शाळेत शिक्षक आहेत.मुलांच्या शिक्षणानिमित्त शहरात वास्तव्यास आहेत.त्यांचे आईवडील गावाकडे राहून शेती सांभाळतात.परंतु, त्यांचा दुसरा मुलगा म्हणजे दत्तप्रसाद यांचा भाऊ



दुसऱ्या खात्यात सरकारी नोकरदार आहे.तो इतका नालायक आहे की पत्नीच्या इशाऱ्यावर नाचत असतो जणू सर्कस मधला जोकर. तो त्याच्या पत्नीचे ऐकून दत्तप्रसाद यांना व आईवडिलांना शेताच्या वाटणी वरुन सतत धमक्या देतो, आईवडिलांना घाण शिव्या देतो. हे सगळं त्याच्या संस्कार हीन पत्नी मुळे घडत आहे...

वयाची सत्तरी गाठलेल्या अनंतराव यांचे पक्ष घाताने निधन झाले होते. तेराव्या दिवशी माळेचा कार्यक्रम पार पडला. चौदाव्या दिवशी गोड जेवणाचा कार्यक्रम चालू होता. पाहुणे व भावकीतले लोक गोड जेवण जेवले. परंतु, त्यांच्या दोन सुना गोड जेवण जेवत नव्हत्या. गोडजेवण कोणाचेही असो अंधश्रध्देपोटी ते गोडजेवण न जेवणे हा त्यांचा दृढनिश्‍चय होता. त्यांचे पती सुध्दा त्यांना काही म्हणत नव्हते. तेवढ्यात कोणीतरी म्हटले,ह्या बाया सासऱ्याचे गोड जेवण जेवत नसतील तर ह्या बाया मेल्यावर यांचे गोड जेवण आम्ही ही जेवणार नाही. हे ऐकून त्या सुनांचा चेहरा पहाण्यासारखा झाला होता... एका प्रसिद्ध गावातील सुसंस्कारित व उच्च शिक्षित व्यक्तीचं ते एक कुटुंब. कुटुंबातले सगळे उच्च पदावर कार्यरत आहेत. अगदी महिला सुध्दा नोकरदार आहेत. परंतु एका भावाचा एकुलता एक मुलगा कुसंगतीने पूर्णतः वाया गेलाय.त्याने शिक्षण अर्ध्यावर सोडलंय. व्यसन त्याचा आवडता छंद झालाय. घरात कशाची कमतरता नाही.सगळी रेलचेल आहे. परंतु,याच्या वागण्याने सगळे त्रस्त आहेत, मानसिक तणावाखाली जगत आहेत.केवळ आपल्या वागण्यामुळे घरातले सगळे नातलग बेजार आहेत याची त्याला थोडीही जाणीव नाही.तो घरातील कोणत्याच व्यक्तीचे शहाणपणाचे चार शब्द ऐकून घ्यायला तयार नाही.. आपल्या अवतीभवती असे संस्कारहीन नमुनेदार माणसे खूप आढळतात. त्यांचे व्यवहार, त्यांचे वर्तन, त्यांचे आचरण आणि नातलगासोबतचा त्यांचा असभ्यपणा कमालीचे दुःख देणारा असतो.या नमुनेदार माणसांचा हा खेळ इतरांच्या जीवावर बेतणारा असतो. हे खेळ फार पूर्वीपासून चालत आलेले आहेत आणि यापुढेही असेच चालू राहणार आहेत. माणसे इतके निष्ठूर आणि निर्दयी असतात हे बहुधा लोकांना माहीत नाही!

# शेतकरी जगातील सर्वात मेहनत घेणारी व्यक्ती

आधुनिक केसरी

**राष्ट्रीय शेतकरी दिवस किंवा किसान दिन हा दिवस भारताचे पाचवे पंतप्रधान चौधरी चरण सिंग यांच्या स्मरणार्थ २३ डिसेंबर रोजी साजरा केला जातो. हा दिवस शेतकऱ्यांचे महत्व आणि शेतकऱ्यांनी दिलेले योगदान याचे प्रतिक आहे. चौधरी चरण सिंग हे शेतकरी कुटुंबातील होते आणि भारताचे पाचवे पंतप्रधान असूनही साधे जीवन जगणे हेच ठरविले. त्यांनी लालबहादूर शास्त्री यांनी दिलेल्या " जय जवान जय किसान " या प्रसिद्ध घोषणेचे त्यांनी पालन केले. हे एक अतिशय यशस्वी लेखकही होते, आणि अनेक अनेक पुस्तकेही लिहिली. त्यात शेतकरी माणि त्यांच्या समस्या या विषयांवर विचार मांडलेले आहेत.**

भारत हा मुख्यतः खेड्या- पाड्यांचा देश आहे. या खेडया-पाड्यांमध्ये बहुसंख्य लोकसंख्या शेतकरी आहेत. त्यांच्या उत्पनाचा हा मोठा भाग आहे. अजुनही ७० ते ८० % भारतीय लोकसंख्या शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नावर अवलंबून आहेत. शेतकरी हा शेतात रात्रंदिवस राबून अन्न तयार करीत असतो. आणि मग लोकांचे पोट भरते. म्हणून महात्मा गांधीनी आपल्या गावाला भारताचा आत्मा आणि भारतीय संस्कृतीला शेतकऱ्यांची संस्कृती म्हटले आहे. शेतकरी हा आपल्या समाजाचा कणा आहे. आपण जे अन्न खातो ते सर्व शेतकरीच पुरवतो. संपूर्ण लोकसंख्या शेतावर अवलंबून असल्याने मग कुठलाही देश लहान असो वा मोठा, तो अन्नाशिवाय जगूच शकत नाही. म्हणून मातीतून सोने पिकवणारा हा बळिराजा खुपच महत्त्वाचा आहे. शेतकऱ्याची दिवस- रात्र फक्त कष्ठाने भरलेली आहे. मग ती थंडी असो वा कडक ऊन जिथे लोक थंडगार ऑफिसमध्ये असतात तेव्हा शेतकरी कडक उन्हात शेत नांगरत असतो. सीमेवरही आपल्या सैनिकांना अन्नधान्य पुरवणारा शेतकरीच आहे, मोठमोठ्या कारखान्यात माल निर्माण करणारा शेतकरीच आहे, भारताची एकूण अर्थव्यवस्था शेतकामांवर अवलंबून आहे. गहू, तांदुळ, ज्वारी, बाजरी आणि इतर सर्व पिके पिकविणारी हे शेतकरी जगातील सर्वात मेहनत घेणारा व्यक्ती मानला जातो.

भारतातील शेतकऱ्यांची परिस्थिती सध्या बिकट आहे. दर आठवड्यात किंवा महिन्यात शेतकऱ्यांच्या काही वाईट बातम्या आपण ऐकूण असतो. त्यांना पुरेसा फायदा होत नसल्याची समस्या दिसून येते. मध्यस्थीना सवाधिक पैसा मिळत असल्याने शेतकऱ्याच्या हाती काहीच लागत नाही. त्यामुळे किसान जगणार कसा ? योग्य आहार नाही, उपासमार या प्रसंगाला सामोरे जावे लागते. म्हणून शेतकरी समाजात प्रत्येक सुखसोयीपासून वंचित आहे. आपणच आपल्या शेतकऱ्याला वाचवण्यासाठी आणी त्यांना मदत करण्यासाठी आपण पुढाकार घेतला पाहिजे.

दिनेश जयराम हुमणे
डोंबिवली
9833557044

# जीवनदायिनी श्रीमद् भगवद्गीता!



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**कोणताही ग्रंथ अथवा वैश्विक विचार हा एखाद्या धर्म, व्यक्ती अथवा देशासाठी मर्यादित नसतो. काळ नित्य प्रवाही असून विश्वाच्या चलन वलनात सर्वत्र समान विचारांचा प्रवाह नित्य वाहत असतो हे विसरून चालणार नाही. त्याच न्यायाने जगात अनेक महान धुरिणांनी अनेक विचार-ग्रंथांची रुजवणूक करून ठेवली आहे. त्यातील एक म्हणजे श्रीमद् भगवद्गीता! जगात विविध धर्म-विचारांच्या अनुषंगाने बायबल, कुराण, बुद्ध आणि त्यांचा धम्म, जेंद अवेस्ता, गुरु ग्रंथ साहिब या विविध ग्रंथांचे अवलोकन केल्यास हे सर्वच ग्रंथ आपापल्या धर्मातील आणि त्या अनुषंगाने वैश्विक जीवन मूल्य अधोरेखित करतांना आढळून येतात.**

यातीलच एक ग्रंथ म्हणजे श्रीमद् भगवद्गीता होय. इतर सर्वच धर्म ग्रंथांची पार्श्वभूमी विभिन्न असून त्यातील श्रीमद् भगवद्गीता या ग्रंथाची निर्मिती ही मोठी क्रांतिकारी आणि सर्वांना थक्क करणारी आहे. या ग्रंथाचे कथन म्हणजेच निर्मिती एखाद्या प्रार्थनास्थळी झाली नसून तो प्रत्यक्ष कुरुक्षेत्र या युद्धस्थळी श्रीकृष्ण-अर्जुन यांचा जीवन जगणे-मरणे या विषयावरचा सैद्धांतिक संवाद आहे हे विशेष! प्रस्तुत ग्रंथाची निर्मिती प्रश्न-उत्तर धरतीवर झाली आहे. त्यासाठी हा ग्रंथ निर्माण अथवा कथन होतांना कोणताही धर्म अथवा व्यक्ती समोर ठेवून नाही तर संपूर्ण मनुष्य आणि त्याने आपल्या जीवनात विविध प्रसंगी करावयाचे वर्तन या संदर्भाने वारंवार विवेचन आले आहे. त्यामुळे हा ग्रंथ सर्वच माणसांच्या सर्वच प्रश्नांची म्हणजेच संसारिक, अध्यात्मिक, आर्थिक, शैक्षणिक, बौद्धिक, सैद्धांतिक उत्तरे देणारा विश्व कल्याणकारी, जीवनदायिनी ग्रंथ आहे असे म्हणणे वावगे ठरू नये! श्रीमद् भगवद्गीता ग्रंथात कुठेही एका विशिष्ट धर्माचा उल्लेख आढळत नसून ती दैनंदिन संसाराच्या युद्ध क्षेत्रावरील लढाई लढणाऱ्या माणसांना प्रेरित करणारी, वर्तन करायला लावणारी, लढायला आणि प्रसंगी शांत रहायला शिकवणारी ही एक सर्वोच्च कलाकृती आहे! श्रीमद् भगवद्गीता म्हणजे श्रीकृष्ण-अर्जुन यांचा अलौकिक संवाद! एकूण ७०० श्लोक असलेल्या या संस्कृत ग्रंथातील सर्वच्या सर्व १८ अध्याय म्हणजे मानवी जीवन जगण्याचे अद्भुत तत्वज्ञान विषद करणारा १८ भागांतील नितांत सुंदर ग्रंथ! प्राचीन कालखंडापासून सांप्रत काळापर्यंत अनेक तत्ववेते प्रस्तुत ग्रंथाच्या विषय-आशयाकडे आकर्षित झाले आहेत आणि दिवसेंदिवस या ग्रंथाचे अभ्यासक वाढतच आहेत ही मोठी आनंदाची बाब आहे. या ग्रंथातील विषय मोठा मजेशीर आहे. तो तुमच्या आमच्या रोजच्याच गोष्टींसारखाही आहे आणि जपी-तपी-ऋषी-मुनि-ध्यानी-योगी यांच्या पण कामाचा आहे. या ग्रंथात मूळ ग्रंथ सोडून कालौघात नक्कीच काही श्लोकांची घुसखोरी झाली असावी. या ग्रंथात एकूण चारच पात्र असून त्यांचा एकमेकांशी संवाद होतांना दिसतो. हा ग्रंथ म्हणजे श्री कृष्ण शिष्टाई असफल झाल्यानंतर पांडवांना आपले अस्तित्व सिद्ध करण्यासाठी आणि आपले अधिकार परत मिळवण्यासाठी युद्ध करणे क्रमप्राप्त होते. इथेही 'पांडवांनी युद्ध केले नसते तर विनाश टळला असता' असाही एक मतप्रवाह ऐकायला येतो. परंतु कधी कधी आपले अधिकार मिळवण्यासाठी 'नाठाळाच्या माथी काठी हाणावी' लागते. त्याच न्यायाने पांडवांचा मामेभाऊ असलेल्या श्री कृष्णाने या निर्णयाला सहमती दर्शवली असावी. यामुळे या अगोदरही एका लेखात श्री राम आणि श्री कृष्ण हे देव नसून माणूस म्हणून दिव्य काम करणारे महापुरुष आहेत याचे मी प्रतिपादन केले आहे. त्यामुळेच या दोन्ही महान भारतीय नायकांकडून काही चुका सुद्धा घडल्या आहेत हे लक्षात घेणे गरजेचे वाटते. एखाद्याला दैवत्व बहाल केले की; माणूस त्याचे गुण-दोष पहात नाही. त्यामुळे हे दोन्ही महापुरुष होते हेच महत्वाचे! अगोदर युद्धाला तयार झालेले पांडव आणि त्यानंतर आपलेच आप्तेष्ट, गुरु समोर युद्धाला तयार आलेले पाहून अर्जुनाला या सगळ्या गोष्टींचा विषाद येतो आणि इथूनच गीतेचा



जन्म होतो. आपल्याच लोकांशी युद्ध करायला प्रवृत्त करण्यासाठी श्री कृष्णाला आपला परम शिष्य अर्जुनाला अनेक नीती-तत्वे सांगून क्षत्रिय धर्म निभावायला सांगितले. याशिवाय कुरुक्षेत्रावरील इतिवृतांत कथन करण्यासाठी हस्तिनापूरचे महाराज धृतराष्ट्र दिव्यदृष्टी लाभलेल्या संजयाला विविध प्रश्न विचारून या ग्रंथाच्या प्रश्न-उत्तर भागात समाविष्ट करून घेतलेले आढळून येते. श्रीमद् भगवद्गीता ग्रंथातील सर्वच श्लोक अन त्यातून समोर येणारे तत्वज्ञान हे सार्वकालिक आणि सर्वच मानवांना संसारातील अनेक प्रसंगांना सामोरे जाण्यासाठी अत्यंत मोलाचे असे मैलाचे दगड आहेत असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

महान तत्वज्ञ श्री विनोबा भावे आपल्या गीताई ग्रंथात या ग्रंथाविषयी "आपले हे भाग्य आहे की; येथे जेवढे धान्याचे पिक येते त्यापेक्षा जास्त येथे ज्ञानाचे पिक आलेले आहे. बारा चौदा संपन्न भाषा येथे आहेत." एवढा सर्वांगीण आणि समृद्ध ग्रंथ भारतात अन्य कोणताही मिळणार नाही. याचा अर्थ असा की गीता हा केवळ धर्मग्रंथ नसून एक उच्च कोटीतील ज्ञानाचे भांडार असणारा जीवनदायी अमृत ग्रंथ आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही. गीता हा समत्व बोधाचा ग्रंथ असून यातून अनेक बाबींचे ज्ञान वाचकांना झाल्याशिवाय रहात नाही. येथे तुम्हाला जीवनात लागणाऱ्या ज्ञान, भक्ती, वैराग्य, आनंद, योग, प्राणायाम, ध्यान आणि जीवन जगण्यास मूलगामी लागणारे धैर्य तत्व या ग्रंथात वाचायलाच काय अर्जुनाच्या रूपाने अनुभवायला मिळणार आहे हे महत्वपूर्ण म्हणावे लागेल. शिवाय इथे श्रद्धा सर्वोच्च स्थानी विराजमान असून बुद्धीपेक्षा श्रद्धेला अनन्य साधारण महत्व दिलेले आढळून येते. प्रज्ञा हा आणखी एक गीतेचा अळंकार आपल्याला अनुभूतीत येतो. संपूर्ण गीतेचे तत्वज्ञान प्रज्ञा आणि विवेकावर आधारित असून माणसाला जगण्याचेच काय मरण्याचे सुद्धा सरळ सोपे तत्वज्ञान या ग्रंथात मिळते. गीता ही वाचकांना गरुडासारखे आकाशात मुक्त विहार करायला सामर्थ्य देते त्याच बरोबरीने आपले लक्ष आपल्या घरट्यावर म्हणजेच मनावर ठेवायचे मार्गदर्शन करते. सांप्रतकाळी आपण मिडीयाचा भूलभूलैया चक्रव्यूहातून बाहेर येऊन अनेक ग्रंथाचे वाचन-चिंतन-मनन करण्याची वेळ आली आहे. श्रीमद् भगवद्गीता ग्रंथाचा प्रारंभ "ध" अक्षरापासून होऊन "र्म" या अक्षरावर येऊन थांबतो. याचा अर्थ गीता ग्रंथ हा धर्म या एकाच महत्वपूर्ण तत्वाच्या भोवताल फिरते. धर्माच्या अनेक व्याख्या आहेत. धर्म म्हणजे धारणा, गुणधर्म! माणसाचा मूळ धर्म काय आहे? याची उत्तरे या ग्रंथात सापडतात. त्यासाठी माणसाने माणसासोबत माणसासारखे वागणे म्हणजे धर्म! शांती, आनंद, विवेक इत्यादी माणसाची मूलगामी तत्वे असून माणसाने माणसाचा धर्म कसोशीने पालन करून आपल्या सोबतच संपूर्ण विश्वाचे कल्याण कसे होईल? याचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. गीतेतील अर्जुनाने विचारलेले प्रश्न आपल्या दैंदिन जीवनात कामी येतात. त्याला दिलेली अनेक उत्तरे आज आपल्या संसारिक प्रश्नांची सोडवणूक करायला सहाय्यभूत ठरतात हे महत्वाचे आहे. त्यामुळेच श्रीमद् भगवद्गीता हा केवळ धर्मग्रंथ नसून ती जीवनदायिनी सरिता आहे. या प्रवाही सरीतेत आपणही डुंबून आपली सर्वांगीण वैचारिक-बौद्धीक तहान भागवून घ्यावी. असे होणे म्हणजेच आज गीता जयंतीदिनी या ग्रंथाचे आपल्या जीवनात महत्व रुजणे होय!

# डॉ. आंबेडकर - पेरियार रामासामी यांची बौद्धिक मैत्री



भीमराव सरवदे
संपर्क क्र : 9405466441

आधुनिक केसरी

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पेरियार रामासामी हे त्यांच्यातील मतभेद आणि नि:संदिग्ध साम्य यांमुळे संपूर्ण विश्वाने त्यांना आधुनिकतेचा स्वीकार केल्याचे प्रतीक समजलेले असून समग्र मानवजातीसाठी व विशेषतः जातिव्यवस्थेला बळी पडलेल्या व्यक्तींसाठी ते प्रेरणास्रोत आहेत. भारतातील जातिविरोधी चळवळींचा इतिहास अत्यंत गुंतागुंतीचा आणि वैविध्यपूर्ण आहे. या महामानवांच्या विविध भाष्यकारांनी केलेल्या समीक्षेत बौद्धिक समानता आणि भिन्नता दोन्ही प्रतिपादित केलेल्याआढळून येतात. या संदर्भात डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि पेरियार रामासामी यांची बौद्धिक मैत्री तर्कशुद्ध तर होतीच पण दीर्घकाळ टिकली सुद्धा.**

१९२० च्या दशकाच्या उत्तरार्धापासून पेरियार यांची स्वाभिमानी चळवळ डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यावर प्रभावित होऊन त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करू लागली. डिसेंबर १९२७ मध्ये महाडमध्ये मनुस्मृती दहनापूर्वी मद्रास येथे आदि द्रविडचे नेते एम. सी. राजा आणि स्वाभिमान चळवळीतील एक प्रमुख व्यक्तिमत्त्व जे. एस. कन्नपार यांनी मनुस्मृती जाळली होती. १९२९ मध्ये पेरियार यांनी जळगाव डिप्रेस्ड क्लासेस कॉन्फरन्ससाठी शुभेच्छा दिल्या आणि त्यांच्या कुडिआरसू या साप्ताहिकाने मुंबई प्रेसिडेन्सीमध्ये स्वाभिमान चळवळीच्या उदयाचे स्वागत केले होते. स्वाभिमान चळवळीने प्रकाशित केलेल्या पेरियार यांच्या रिव्होल्ट या एकमेव इंग्रजी साप्ताहिकाने समाज समता संघाच्या परिषदांचे विस्तृत वृत्त प्रकाशित केले आणि किमान दोन वेळा बाबासाहेबांच्या भाषणांचा विस्तृत वृत्तांत प्रकाशित केला. रिव्होल्टचे संपादक एस. गुरुस्वामी हे बाबासाहेबांच्या विचारांनी प्रचंड प्रभावित झालेले होते. रिव्होल्टच्या २३ जून १९२९ च्या अंकात नाशिक जिल्ह्यातील चित्तेगाव येथे दिनांक २६ मे १९२९ रोजी आयोजित स्वाभिमान संरक्षक परिषदेचा वृत्तांत प्रकाशित केला होता. या परिषदेच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. या परिषदेच्या यशस्वीतेसाठी पेरियार रामासामी यांचा शुभेच्छापर संदेशही आला होता. डॉ बाबासाहेब आंबेडकरांसोबतचे हे स्नेहाचे संबंध गोलमेज परिषदांच्या वेळी अत्यंत पाठिंब्याचे होते.

त्याचबरोबर दलितांसाठी स्वतंत्र मताधिकाराच्या मागणीच्या विरोधात देशातील जनमत शिगेला पोहोचले होते त्या प्रसंगीसुद्धा बाबासाहेबांच्या पाठीशी पेरियार रामासामी खंबीरपणे उभे होते.

या निमित्ताने कुडिआरसूमध्ये संतप्त आणि मार्मिक लेखांची मालिका प्रकाशित करण्यात आली होती, ज्यात गांधीजी हेच केवळ अस्पृश्यांच्या हिताचे प्रतिनिधित्व करतात या त्यांच्या दाव्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले होते. बाबासाहेबांच्या स्वतंत्र मताधिकाराबाबतच्या मतांना पाठिंबा देण्यासाठी आणि मुंजे-राजा कराराला विरोध करण्यासाठी स्वाभिमान चळवळीच्या कार्यकर्त्यांनी जाहीर सभा घेतल्या होत्या. गांधीजींनी जेव्हा स्वतंत्र मतदारसंघाच्या विरोधात उपोषणाची घोषणा केली, तेव्हा कुडिआरसू या वृत्तपत्रातून गांधीजींच्या रणनीतीवर कडवट टीका केली होती. पुढील अनेक वर्षे बाबासाहेबांबद्दलचे त्यांचे स्नेह आणि पाठिंबा कायम राहिला.

कुडिआरसू या पत्राने बाबासाहेबांच्या जातिसंस्थेचे निर्मूलनचा तमिळ अनुवाद अनेक आठवडे (१४.७.१९३६ पासून पुढे) क्रमशः प्रकाशित केला आणि तामिळ भाषेत १९३७ मध्ये पुस्तक रूपानेही प्रकाशित केले.

महाडच्या सत्याग्रहापासून स्फूर्ती घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली अस्पृश्यांनी अनेक सत्याग्रह केले. त्यातला महत्त्वाचा सत्याग्रह म्हणजे पर्वती सत्याग्रह. पुणे येथे पर्वतीच्या टेकडीवरील पर्वती मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह दिनांक १३ ऑक्टोबर १९२९ रोजी करण्यात आला. या सत्याग्रहात सत्याग्रहींना दगड गोट्यांचा मार खावा लागला तरी सत्याग्रही मागे हटले नाहीत. या सत्याग्रहात बाबासाहेबांचे सहकारी पी.एन. राजभोज व एन. व्ही. गाडगीळ यांना बराच मार लागला. यामध्ये राजभोज हे बेशुद्ध पडले होते. या सत्याग्रहास पाठिंबा देण्यासाठी मद्रास येथे २२. १०. १९२९ रोजी नेपियर पार्कमध्ये बहिष्कृत वर्गाची एक सभा भरवण्यात आली होती. या सभेत पर्वती सत्याग्रहींच्या अभिनंदनाचा ठराव मांडण्यात आला.

याप्रसंगी ठरावास पाठिंबा देऊन पेरियार रामासामी म्हणाले की, सध्याच्या राजकीय पद्धतीमध्ये देवालय प्रवेशासंबंधीचा कायदा पास करून घेणे कठीण आहे. ब्राह्मणेतरांना याबाबतीत तेवढी कळकळ नाही, त्यांना स्वतःला या बाबतीत आंच पोचत नाही. त्या अर्थी या कामी स्वतः अस्पृश्यांनीच पुढाकार घेतला पाहिजे. (बहिष्कृत भारत, दिनांक १५ नोव्हेंबर १९२९ पान क्र. ३) वायकोम येथील मंदिर प्रवेश आणि त्या बाजूने जाणाऱ्या रस्त्यावरून जाणे अस्पृश्यांना प्रतिबंध केलेले होते त्यासंदर्भातील तेथील अस्पृश्यांनी केलेल्या वायकोम सत्याग्रहाची बाबासाहेबांनी दखल घेतली होती. यासंदर्भात बाबासाहेब म्हणतात, हिंदू समाजव्यवस्थेविरुद्ध अस्पृश्यांनी केलेल्या उठावाची कल्पना यावी म्हणून प्रत्यक्ष कृतीच्या अशा प्रयत्नांचा उल्लेख फारच थोड्यांचा करता येईल. सार्वजनिक रस्ते वापरण्याच्या अधिकाराचे समर्थन करण्याच्या प्रयत्नांपैकी, या संदर्भात एक उल्लेखनीय प्रयत्न म्हणजे १९२४ मध्ये त्रावणकोर स्टेटच्या अस्पृश्यांनी वायकोम येथील



मंदिराभोवती असलेल्या रस्त्यांचा वापर करण्यासाठी केला होता. हे रस्ते प्रत्येक नागरिकांना वापरता यावे म्हणून राज्याने निर्माण केलेले हे सार्वजनिक रस्ते होते, परंतु मंदिराच्या अगदीच जवळून जाणाऱ्या रस्त्यावरून जाण्याची अस्पृश्यांना परवानगी नव्हती. शेवटी सत्याग्रहाचा परिणाम म्हणून मंदिराचे कंपाऊंड वाढविण्यात आले आणि रस्त्याची पुनर्रचना करण्यात आली जेणेकरून अस्पृश्य त्या रस्त्यावरून गेले तरी पूर्वीपेक्षा ते मंदिरापासून दूर असल्याने प्रदूषित होण्याचे भय राहिले नव्हते. (बीएडब्ल्यूएस, खंड ५, पृष्ठ क्र. २४७) वायकोम चळवळीत पेरियार यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. दक्षिणेतील ही चळवळ बाबासाहेबांना केवळ ज्ञात नव्हती तर त्यांचे त्या चळवळीवर बारीक लक्ष्य होते. बाबासाहेब हे मद्रासच्या शोषित वर्गातील नेत्यांच्या निकट संपर्कात होते. रेट्टामलाई श्रीनिवासन यांच्याशी असलेले त्यांचे संबंध आणि एम. सी. राजा यांच्याशी दीर्घकाळ चाललेला संघर्ष यावरुन हे स्पष्ट होते. श्रीनिवासन हे लंडनमधील गोलमेज परिषदेत बाबासाहेबांच्या सोबत होते. जस्टिस पार्टीचे नेते, मद्रासचे महापौर आणि पेरियार रामासामींच्या स्वाभिमान चळवळीचे सहकारी एन. शिवराज यांच्याशीही बाबासाहेबांचे नाते अगदी जवळचे होते. याच संबंधामुळे १९४०च्या दशकात शेड्युल्ड कास्टस फेडरेशनची स्थापना झाली. एन. शिवराज हे या फेडरेशनचे पहिले अध्यक्ष होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पेरियार यांच्याशी पहिली भेट १९४० साली झाली, त्यात दोघांनी स्वतंत्र भारतातील दलित आणि ब्राह्मणेतर (शूद्र) जातींच्या राजकीय भवितव्याविषयी चर्चा केली. १९४४च्या मद्रास भेटीदरम्यान, बाबासाहेबांनी शहरातील पाच सभांना संबोधित केले. या बैठकीची माहिती खैरमोडे यांच्या ९ व्या खंडात दिलेली आहे. ती अशीः दक्षिण भारतात पूर्वी (१९२०–३६) ब्राह्मणेतरांचा पक्ष (जस्टीस पार्टी) फार प्रबळ होता, तो १९३७ च्या नंतर डबघाईस आला. त्याचे पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न जून १९४४ पासून सुरु झाले. यासाठी मद्रास प्रांतात बऱ्याच सभा झाल्या. अशा तऱ्हेची एक मोठी सभा २४–२५ सप्टेंबर १९४४ ला सालेम या शहरात भरवण्याचे जाहीर झाले होते. बाबासाहेबांना या चळवळीची माहिती मिळाली तेव्हा त्यांना ब्राह्मणेत्तर पुढाऱ्यांच्या बरोबर चर्चा करून या विषयाची संपूर्ण माहिती मिळवण्याची इच्छा झाली. त्यांनी सदर चळवळीचे प्रमुख श्री. ई. व्ही. रामासामी नायकर यांना भेटण्यास या म्हणून आमंत्रण पाठवले, तेव्हा श्री. नायकर बाबासाहेबांना भेटण्यासाठी मद्रासला शनिवार दि. २३–९–१९४४ ला आले. चेट्टीनाड हाऊस, अड्यार येथे दोघांनी दोन तास चर्चा केली. ब्राह्मणेत्तर पक्षाच्या सामाजिक व धार्मिक कार्यक्रमाला आपला पाठिंबा आहे व पुढेही राहील, असे बाबासाहेबांनी श्री. नायकर यांना आश्वासन दिले. (डॉ. भीमराव आंबेडकर चरित्र खंड क्र.९ ले. चां भ खैरमोडे पृष्ठ ३२२) जातीव्यवस्थेशी संबंधित असलेल्या स्त्रियांच्या प्रश्नावर बाबासाहेब आणि पेरियार यांचे एकमत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कोलंबिया विद्यापीठात शिक्षण घेत असताना प्रथम विद्यार्थ्यांच्या चर्चासत्रात जातीव्यवस्था टिकविण्याबाबत महिलांच्या भूमिकेविषयी भारतातील जाती या निबंधात आपले विचार मांडले. १९४० च्या दशकात लिहिलेल्या रिव्होल्यूशन अँड काउंटर रेव्होल्यूशन इन एन्शंट इंडिया याग्रंथात ते पुन्हा त्याच विषयाकडे वळले. धर्मग्रंथात स्त्रियांवर, विशेषतः मनुस्मृतीमध्ये आणि विशेषतः ब्राह्मण समाजातील स्त्रियांवर घालण्यात आलेल्या निर्बंधांविषयी त्यांनी माहिती दिली. स्त्रियांच्या जीवनावर नियंत्रण आणि नियमन करण्याची सूत्रे हे ग्रंथ कसे ठरवतात, हे त्यांनी स्पष्ट केले. अतिरिक्त स्त्रियांच्या (विधवा स्त्रियांना मनुस्मृतीने अतिरिक्त ठरविले होते) व्यवस्थेच्या क्रूर मार्गाने स्त्रियांवर नियंत्रण प्रस्थापित झाले आणि बौद्ध धर्मावर ब्राह्मणधर्माचा विजय मिळविण्याच्या दृष्टीने हा एक महत्त्वाचा घटक होता असे मत त्यांनी मांडले होते.

पेरियार यांनी स्त्रियांच्या प्रश्नाचा वेगळ्या दृष्टिकोनातून विचार केला. ते म्हणाले की, विवाह, मातृत्व आणि कुटुंबातील लैंगिक राजकारण हे स्त्रियांना त्यांचे हक्क नाकारण्याच्या मुळाशी आहेत. जातिव्यवस्थेचा गाभा म्हणून कुटुंब हे स्नेह आणि नियंत्रण या दोन्हींचे केंद्र आहे. कुटुंब हे असे ठिकाण आहे जिथे स्त्रियांचे आणि पुरुषांचेही सामाजिक व्यक्तिमत्त्व विकसित होते. पेरियार म्हणाले की, पुरुषत्व आणि स्त्रीत्व या संकल्पना आपण निर्माण केल्या आहेत, त्यापलीकडे जाऊन आपण हे समजून घेतले पाहिजे की, बहुतेक मानवी गुण हे स्त्री आणि पुरुष या दोघांमध्येही असतात आणि स्त्रिया पुरुषांपासून वेगळ्या असतात, ते म्हणजे पुरुषांना जन्म देण्याची आणि त्याला जिवंत ठेवण्याची त्यांची क्षमता होय. यानंतरही स्त्रियांना नीच आणि दुर्बल समजले जाते आणि त्यांना केवळ कुटुंबापुरतेच मर्यादित ठेवले जाते. आर्थिक व्यवस्थेसंबंधी दोघांची मते समजून घेणेही उपयुक्त ठरेल. समाजवादी नियोजनाच्या सोव्हिएट मॉडेलने डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रेरित झाले होते आणि कल्याणकारी राज्याची संकल्पना त्यांना प्रिय होती. त्यांना न्याय्य अर्थव्यवस्था, सामूहिक शेती आणि सोव्हिएत युनियनसारखे सरकारी उद्योग हवे होते, पण त्याचबरोबर खासगी उद्योजकांच्या प्रयत्नांसाठीही त्यांना अर्थव्यवस्थेत स्थान हवे होते. पेरियारही समाजवादाकडे आकर्षित झाले होते आणि १९५० च्या दशकात त्यांच्या द्रविड कझगम यांनी स्वतःची कामगार संघटना स्थापन केली होती. पेरियार यांनी आर्थिक जीवनाविषयीच्या आपल्या मतांची सविस्तर माहिती दिली नसली, तरी उत्पादक जीवनाच्या महत्त्वावर त्यांनी भर दिला. औद्योगिकीकरणाच्या माध्यमातून देशाची प्रगती व्हावी, अशी त्यांची इच्छा होती आणि बाबासाहेबांप्रमाणे त्यांनीही आरक्षणाच्या माध्यमातून राज्यातील संस्थांमध्ये ब्राह्मणेतर आणि दलितांचे अस्तित्व वाढविण्यास सहमती दर्शविली. स्वातंत्र्यापूर्वी त्यांनी सावकारी व्याज यंत्रणेस समाप्त करणे, जमीन पट्ट्यांच्या नियमात सुधारणा करणे आणि मालमत्तेचे न्याय्य वाटप करणे या गोष्टींचा पुरस्कार केला होता. पेरियार आणि बाबासाहेबांचा दृष्टिकोन आणि त्यांचे तर्कवाद त्यांच्या काळात असलेल्या ऐतिहासिक परिस्थितीच्या संदर्भात विकसित झालेले होते ज्यामध्ये त्यांना परिवर्तनाची अपेक्षा होती. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि शेवटी मैत्री ही बौद्ध संकल्पना हे बाबासाहेबांसाठी आदर्श होते. पेरियार यांचा असा विश्वास होता की, माणसाकडे गोष्टी समजून घेण्यासाठी, त्यांचा न्याय करण्यासाठी आणि न्यायी समाजाची स्थापना करण्यासाठी पुरेसा विवेक आहे. एकाला अपार करुणा होती तर दुसऱ्याला अस्तित्ववादाची आस होती. बाबासाहेब आणि पेरियार हे त्यांच्यातील मतभेद आणि त्यांच्यातील निर्विवाद साम्य यांमुळे दलित आणि बहुजन समाजाने आधुनिकतेचा स्वीकार केल्याचे प्रतीक आहेत आणि त्यांच्या जागतिक दृष्टिकोनाकडे आकर्षित झालेल्या व्यक्तींसाठी, विशेषतः जातिव्यवस्थेला बळी पडलेल्या समाजासाठी ते प्रेरणास्त्रोत आहेत. आपण त्यांच्या कल्पना व त्यांचे विचार विसरता कामा नये. त्यांच्या आदर्शवादी मार्गाने जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे! पेरियार रामासामी यांच्या स्मृतीदिनानिमित्त विनम्र अभिवादन!

# नांदेड जिल्ह्यात मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान

## प्राथमिकच्या शिक्षणाधिकारी डॉ. सविता बिरगे यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान सुरू करण्यात आले असून या अंतर्गत विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येत असल्याची माहिती प्राथमिकच्या शिक्षणाधिकारी डॉ. सविता बिरगे यांनी दिली आहे. या अभियानात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण गुणवत्ता विकास, विद्यार्थी केंद्रित आरोग्य व आर्थिक कौशल्य विकासावर भर दिला जाणार आहे. शाळा ही सर्वांगीण दृष्ट्या समृद्ध करणे, शाळेचा परिसर तंबाखूमुक्त प्लास्टिक मुक्त करणे, तंत्रज्ञानाच्या वापरातून अध्ययन अध्यापन प्रक्रिया समृद्ध करणे यावर भर देण्यात येत आहे. सर्व माध्यमांच्या, सर्व व्यवस्थापनांच्या शाळांना या अभियानात सहभागी करण्यात येत आहे. प्राथमिक ते राज्यस्तरापर्यंत वेगवेगळ्या समित्या स्थापन करण्यात आल्या असून त्या त्या स्तरावरील अधिकाऱ्यांचा समावेश त्यामध्ये आहे. प्राथमिक स्तरावर केंद्रप्रमुख हे या समितीचे अध्यक्ष असणार आहेत. जिल्हास्तरावरील मूल्यांकनाचे काम जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मूल्यांकन समिती करणार आहे. शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा आणि अन्य सर्व व्यवस्थापनांच्या शाळांची स्वतंत्र वर्गवारी केली जाणार आहे. जिल्ह्यातील सर्व शाळांनी या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन प्राथमिकच्या शिक्षणाधिकारी डॉ. सविता बिरगे यांनी केले आहे.



शालेय वातावरण आकर्षक करणे, भौतिक सुविधांची निर्मिती, शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करणे, अध्ययन अध्यापन व प्रशासनात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, परिसर स्वच्छता, व्यक्तिमत्त्व विकास, क्रीडा विकास, आरोग्य जपणूक आणि विविध कौशल्य आत्मसात करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे या अभियानाची उद्दिष्टे आहेत.



# शिंगवे, ता.निफाड येथे राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची पुण्यतिथी

## आधुनिक केसरी प्रतिनिधी किरणकुमार आवारे यांचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** परीट संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे व कर्मयोगी राष्ट्रसंत गाडगे महाराज महापरिनिर्वाण पुण्यस्मरण समिती शिंगवे यांचे वतीने कर्मयोगी, विज्ञानवादी राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या ६७ व्या पुण्यस्मरणा निमित्त विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

गेली ३१ वर्षापासून हा उपक्रम राबविण्यात येत असून या यावर्षी स.पो.नि. सुनील पाटील (प्रशासकीय), डॉ.कैलास मोगल (वैद्यकीय), गोदावरी माध्यमिक विद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक विद्यामंदिर शिंगवे ( शैक्षणिक), किरणकुमार आवारे (पत्रकारिता), स्व.वामनराव मोगल नागरी पतसंस्था ( सहकार), कु.शंभू शरद भागवत ( दिल्ली येथे क्रीडा क्षेत्रात गोल्ड मेडल प्राप्त), कु.तेजस्विनी बाळासाहेब कटारे (एस.एस.सी सायखेडा केंद्रात प्रथम), डॉ.गोकुळ मालपुरे यांचा गोदाकाठ मेडीकल असोसिएशनचा धन्वंतरी पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल राष्ट्रसंत गाडगे महाराजांची दशसूत्री, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष सेवानिवृत्त डी.वाय.एस.पी प्रभाकर रायते हे होते. कार्यक्रमास राष्ट्रसंत गाडगे महाराज पुण्यस्मरण समिती संस्थापक रवी सगर, उपाध्यक्ष भाऊलाल कटारे, भास्कर गिते, मनोज जाधव, निवृत्ती भागवत, ग्रामसेविका मनीषा गर्जे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष सारिका डेर्ले व माणिक देसाई, राहुल कटारे, दत्तू कोरडे, कैलासराव डेर्ले, शांताराम जाधव, दिलीप गिते, भास्करराव डेर्ले, निवृत्ती भागवत, कचरू शिंदे, अर्जुन डेर्ले, मनोज जाधव, दत्तात्रय वाघ, छगन कटारे, रोहित कटारे, दिलीप गिते, किसन कमानकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामदास शिंदे यांनी केले. जागृती युवक मंडळ शिंगवे संचलित, गोदावरी माध्यमिक विद्यालयात संत सेवा योगी गाडगे महाराजांची ६७ वी पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी गाडगेबाबांची वेशभूषा परिधान करून व संदेशाचा फलक घेऊन ग्राम स्वच्छतेचे व शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत जि.प.प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांची मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानी जागृती युवक मंडळाचे उपाध्यक्ष भास्करराव गिते होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी पत्रकार किरणकुमार आवारे, मुख्याध्यापिका सुनीता घुगे (पठाडे) आदी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते संत गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मुख्याध्यापिका सुनीता पठाडे यांनी परिसर स्वच्छ ठेवा, उच्च नीच भेदभाव बाळगू नका, सर्वधर्म समभाव जपा, माणसात देव आहे त्याची पूजा करा, गोरगरीब मुलांना मदत करा, प्राणीमात्रांवर दया करा असा संदेश आपल्या मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांना दिला. सूत्रसंचालन डी.बी.वडघुले यांनी तर आभार श्रीमती एम.जी. गोसावी यांनी मानले. याप्रसंगी ज्येष्ठ शिक्षक ए.एस.पाटील, एन.संगमनेरे, व्ही.डी.वडघुले, बी.एस.शिंदे, एस.डी.लबडे, ए.के.देशमुख, एस.एस.कोटूरवार, मोनाली डेर्ले आदी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



# शिक्षिका शर्मिला महेंद्र गावंड द्रोणागिरी भूषण पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** शिक्षण क्षेत्रात गेली २० वर्षे निस्वार्थी वृत्तीने कार्य करणाऱ्या पिरकोन येथील रहिवाशी व नवीन शेवा जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत असणाऱ्या शर्मिला महेंद्र गावंड यांना द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने आदर्श शिक्षिका म्हणून पुरस्कार देवून गौरव करण्यात आले. रायगड जिल्हा परिषद शाळा नवीन शेवा येथे कार्यरत असलेल्या शर्मिला गावंड यांनी कोरोना काळापासून ऑनलाईन शिक्षणाचे धडे मुलांपर्यंत पोहचविण्याचे काम केले, आजपर्यंत त्यांनी अनेक उपक्रम राबविले या कामाची दखल घेवून त्यांना द्रोणगिरी पुरस्कार देण्यात आला.विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना द्रोणागिरी भूषण पुरस्काराने सन्मानित केले जाते. यावर्षी आदर्श शिक्षिका शर्मिला महेंद्र गावंड यांना द्रोणागिरी भूषण आदर्श शिक्षिका पुरस्कार मिळाल्याने त्यांच्यावर सर्वच स्तरातून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. खेळाडू व कलाकारांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनच्या माध्यमातून दरवर्षी द्रोणागिरी युवा महोत्सवाचे आयोजन केले जाते. यंदा दिनांक २० डिसेंबर २०२३ ते २४ डिसेंबर २०२३ या दरम्यान बोकडविरा चारफाटा (एनएमएसईझेड मैदान ), पेट्रोल पंप जवळ, तालुका उरण, जिल्हा रायगड येथे रायगड जिल्हास्तरीय २३ वा युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार दिनांक २० डिसेंबर २०२३ रोजी या महोत्सवाचे उदघाटनच्या नंतर विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा द्रोणागिरी भूषण पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

# सिंदफणा शाळेची सीबीएसई किशोरवयीन शिखर परिषदेत पुरस्कारांची हॅट्रिक

आधुनिक केसरी न्यूज


**माजलगाव :** येथील विद्याभुवन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंदफणा पब्लिक स्कूलने नुकत्याच दिल्ली येथे झालेल्या सीबीएसईच्या किशोरवयीन शिखर परिषदेत नृत्य, नाटक आणि प्रदर्शन अशा तीन उपक्रमामध्ये विशेष जुरी पुरस्कार मिळवत हॅट्रिक केली आहे. त्याबद्दल शाळेवर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. सविस्तर वृत्त असे की, दिनांक १९ डिसेंबर ते २१ डिसेंबर २०२३ या दरम्यान दिल्ली येथे आयोजित केलेल्या केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) च्या "जीवन कौशल्य, मानसिक आरोग्य, सुरक्षितता आणि कल्याण" किशोरवयीन शिखर परिषदेसाठी भारतातील सीबीएसई संलग्नित ३५० शाळांनी सहभाग नोंदविला होता. यामध्ये मराठवाड्याचे प्रतिनिधित्व सिंदफणा पब्लिक स्कूल या एकमेव शाळेने केले. शाळेचे प्रतिनिधित्व इयत्ता नववीतील प्रचिती बुधवंत, अनुश्री मोरे, शौर्य मुगदिया आणि प्रणव सोळंके यांनी केले. या परिषदेत ज्ञानार्जनासोबतच विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव मिळावा म्हणून नृत्य,चित्रकला, प्रदर्शन, भाषण, प्रश्नमंजुषा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यावर्षी नृत्य स्पर्धेत कुमारी प्रचिती बुधवंत या विद्यार्थिनीच्या नृत्यास आणि अनुश्री मोरे या विद्यार्थिनीस स्टॉल प्रदर्शनात तर शौर्य मुगदिया या विद्यार्थ्यास नाटकामध्ये प्रथम क्रमांक मिळवून सिंदफणा पब्लिक स्कूल ने हॅट्रिक केली. या परिषदेत सीबीएसईच्या अध्यक्षा श्रीमती निधी चिब्बर, शैक्षणिक संचालक जोसेफ एम्माऊनेल, मनोज श्रीवास्तव, इंडिया टी. व्ही. चे अध्यक्ष रजत शर्मा, केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या अतिरिक्त सचिव श्रीमती एल. एस. चांगसन, एक्स्प्रेशन इंडियाचे संचालक डॉ. जितेंद्र नागपाल अशा नामवंत व्यक्तींचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. या परिषदेत सिंदफणा शाळेचे प्राचार्य अन्वर शेख यांना इंडिया टी. व्ही. चे अध्यक्ष रजत शर्मा यांच्या स्वागताचा सन्मान मिळाला. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आ. प्रकाश दादा सोळंके, उपाध्यक्ष वीरेंद्र सोळंके, सचिव मंगलाताई सोळंके, समन्वयक नीला देशमुख, प्राचार्य अन्वर शेख, उपप्राचार्य राहुल कदम, शैक्षणिक विभाग प्रमुख सुजा चाको, अर्चना जाधव, सहभागी विद्यार्थ्यांचे पालक तसेच सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# आज दक्षिणायन दिन; वर्षातील लहान दिवस, रात्र मोठी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** वर्षातून दोनदा पृथ्वीवर अयनदिन घडत असतात त्यात २१/२२ डिसेंबर ला दक्षीण अयनदिन तर २१/२२ जून ला उत्तर अयनदिन होतात.दोन्ही वेळी दिवस-रात्र वेळात मोठा बदल घडतो.२२ डिसेंबरला वर्षातील सर्वात लहान दिवस तर मोठी रात्र होत असते. पृथ्वी सुर्या सभोवती भ्रमण करताना २३.५ अंशाने कललेली असते त्यामुळेच पृथ्वीवर ऋतू बदलत असतात.उत्तरायण, दक्षिणायन आणि विषुवदिन घडत असतात. उत्तरायनाची कमाल मर्यादा कर्कवृत्त तर दक्षिणायनाची मकरवृत्त असते.सूर्याच्या दक्षिणेकडुन उत्तरेकडे जाणाच्या भासमान मार्गाला उत्तरायण तर उत्तरेकडुन दक्षिणेकडे जाण्याचा मार्गाला दक्षीनायन असे म्हणतात. २१/२२ जूनला पृथ्वी चा उत्तर ध्रुव सूर्याकडे झुकलेला असतो तर २१/२२ डिसेंबर ला पृथ्वी चा दक्षिण ध्रुव सुर्याकडे कललेला असतो. त्यामुळेच आपल्या कडे सुर्याची किरणे लांब, तिरपी पडतात आणि तापमान कमी होते. रात्र मोठी आणि दिवस लहान होतो. उलट २१ जूनला सर्वात मोठा दिवस आणि रात्र लहान असते. दक्षिण अयनदिन किंवा हिव्वाळी अयनदिन ला एकूण २४ तासांपैकी ११ तास तर रात्र तर १३ तासाची असते असे ढोबळ मानाने होत असले तरी वैज्ञानिक दृष्टिने पाहिल्यास प्रत्येक १०० किमी अक्षावर वेळात बदल होत असतो.पृथ्वी गोल असल्याने सूर्याची किरणे सारखीच सर्व ठिकाणी पडत नाही. अनेक वर्षांनंतर आयनदिन वेगळ्या दिवसाला (२१,२२ डिसेंबर) येत असतात .ह्या २०२३ वर्षी डिसेंबर आयनदिन हा २२ डिसेंबर ला भारतीय वेळेनुसार सकाळी ८.५७ (३.२७ UTC) ला होत आहे.ज्या वेळेला मकरवृत्तावर सूर्य येतो ती वेळ किंवा पृथ्वी चा ध्रुव २३.५ डिग्री उत्तरेला कललेला असेल ती वेळ अयनदिन ची ठरली जाते.परंतु दिवस-रात्रीच्या वेळा मात्र भिन्न असतात. ह्या वर्षीचा आयनदिन २२ डिसेंबर ला सकाळी येत असल्याने २१ आणि २२ डिसेंबर चे दोन दिवस अगदीं थोडया वेळेच्या फरकाने लहान दिवसाचा आणि मोठ्या रात्रीचा आनंद घेता येईल.






**शरीरावर काही परिणाम होतो की? :** खरं तर आपले शरीराचे एक जैविक घड्याळ आहे . दिवस-रात्री प्रमाणे ते काम करीत असते .जेव्हा ह्यात बदल होतो तेव्हा ह्या घड्याळाला बदलावे लागते, ॲडजस्ट करावे लागते, परंतु अनेकदा जाणवत नसले तरी त्याचा शरीराला त्रास होतो .जसे झोपेचे वेळापत्रक बदलते, मूड बदलतो, डोकेदुखी, उदासीनता येते, पचनाच्या समस्या उद्भवतात

**खालील वेळा २२ डिसेंबर च्या आहेत :** मुंबई ला दिवस-१० .५६ ३३ तर रात्र १३ .०३ .५६ तासाची असेल नागपूर ला दिवस-१० .४८ .२८ तर रात्र १३ .१२ .०३ तासाची असेल पुणे येथे दिवस-१० .५८ .४७ तर रात्र १३ .०१ .४३ तासाची चंद्रपुर येथे दिवस-१० .५३ .१३ तर रात्र १३ .०७ .१७ तासाची असेल .

# तब्बल २० वर्षानंतर भरली माजी विद्यार्थ्यांची शाळा

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित न्यू हायस्कूल, करमाड येथे नुकताच २००३ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात पार पडला.

अनेक मित्रमैत्रिणी तब्बल २० वर्षानंतर एकमेकांना भेटल्याने सगळेच आनंदाने भारावून गेले होते. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांसोबतच त्यांना शिकवणारे आणि सध्या वेगवेगळ्या ठिकाणी कार्यरत असलेले, निवृत्त झालेले तत्कालीन शिक्षकही यावेळी आवर्जून उपस्थित होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांचे पुष्पवृष्टी करन हृदय स्वागत केले. विद्यार्थ्यांनी मनोगतात जुन्या आठवणींना उजाळा देत शाळेतील आठवणी, किस्से सांगितले तर शिक्षकांनीदेखील मार्गदर्शन करताना खोडकर, हुशार विद्यार्थ्यांचे त्यावेळचे अनेक घटना,प्रसंग सांगून सगळ्यांना भूतकाळातील कडूगोड आठवणींना उजाळा दिला. माजी विद्यार्थ्यांमधील बरेच जण शासकीय, निमशासकीय नोकरीत तर काही आपापल्या उद्योगव्यवसायात यशस्वी झाल्याचे सांगितले. यावेळी सुरुची भोजनाची व्यवस्था विद्यार्थ्यांनीच केली होती. तसेच सर्व विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष वर्ग देखील भरवला गेला. त्यात सर्व गुरुजनांनी शिकवलेदेखील. विद्यार्थी एकत्र जमून गप्पा,गोष्टी सोबत खो-खो, कबड्डी, फुटबॉलसारखे खेळ खेळले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कर्डिले तर प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य एस. एस. जाधव यांच्यासह अनिल पाटील, अरुण पाटील, पी. आर. पाटील, मरकड, देवकर, गोडसे, आबंदे, सिद्दीकी यांच्यासह शाळेचे शिक्षक, शिपाई शेख हे उपस्थित होते. स्नेहमेळाव्याचे सूत्रसंचालन महेश उकिरडे यांनी केले.




# माजी आ. मनोहरशेठ भोईर यांच्या हस्ते द्रोणागिरी युवा महोत्सवाचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** खेळाडू व कलाकारांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनच्या माध्यमातून दरवर्षी द्रोणागिरी युवा महोत्सवाचे आयोजन केले जाते. यंदा दिनांक २० डिसेंबर २०२३ ते २४ डिसेंबर २०२३ या दरम्यान बोकडविरा चारफाटा (एनएमएसईझेड मैदान ), पेट्रोल पंप जवळ, तालुका उरण, जिल्हा रायगड येथे रायगड जिल्हास्तरीय २३ वा युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार दिनांक २० डिसेंबर २०२३ रोजी या महोत्सवाचे उदघाटन शिवसेनेचे रायगड जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांच्या शुभ हस्ते झाले. सर्वप्रथम श्री द्रोणागिरी देवी (करंजा )येथून क्रीडा ज्योतीचे प्रज्वलन, सायंकाळी ४ वा. क्रीडा ज्योतीचे क्रीडा संकुलात आगमन,४:१५ वा. ध्वजारोहण,४:३० वा. क्रीडा महोत्सवाचे उदघाटन,४:४५ वा. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व मार्गदर्शन असे कार्यक्रम संपन्न झाले. यावेळी माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांनी द्रोणागिरी युवा महोत्सवाचे उत्तम आयोजन व नियोजन केल्याने द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनच्या कार्याचे कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. उपस्थित मान्यवरानींही आपापले मनोगते व्यक्त केली.१२० हुन अधिक वेगवेगळ्या क्रीडा प्रकारांचा( स्पर्धांचा )या महोत्सव मध्ये समावेश असल्यामुळे क्रीडा रसिक प्रेषकांनीही या महोत्सवला मोठया प्रमाणात हजेरी लावली होती. राजकारण विरहित हे युवा महोत्सव असल्याने सर्वच राजकीय पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, विविध सामाजिक संस्था संघटना यांचे पदाधिकारी सदस्य यावेळी उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर माजी आमदार मनोहरशेठ भोईर, जेएनपीटीचे माजी विश्वस्त कॉम्रेड भूषण पाटील, जेष्ठ साहित्यिक एल बी पाटील, कवीश्री अरुण म्हात्रे,जेष्ठ गायक भालचंद्र म्हात्रे,जेष्ठ पत्रकार मिलिंद खारपाटील,द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष महादेव घरत,महिला विभाग प्रमुख वैशालीताई घरत,उपाध्यक्ष मनोज पडते, खजिनदार शिवेंद्र म्हात्रे, सल्लागार नरेश म्हात्रे, सचिव दिलीप तांडेल, क्रीडा प्रमुख भरत म्हात्रे व द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनचे पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.

# झरी येथे आपला संकल्प विकसित भारत रथयात्रेला मोठा प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील झरी येथे दिनांक 20 12 2023 रोजी दुपारी बारा वाजता विकसित भारत संकल्प यात्रा रथ ग्रामपंचायत झरी येथे आला असता आरोग्य विभागाकडून गावातील जनतेची शुगर आणि बीपी तपासण्यात आली यात भरपूर प्रतिसाद मिळाला, भारत सरकारने ज्या सामान्य जनते करता योजना आणलेल्या त्या योजनेची माहिती देण्यात आली यावेळी गावचे सरपंच श्री करणसिंह राजपूत यांनी खुलताबाद पंचायत गटविकास अधिकारी माननीय श्री प्रकाश नाईक सर यांचे सरपंच करणसिंग राजपूत यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊळ ग्रामपंचायत वतीने सत्कार करण्यात आले , तसेच एलजी गायकवाड यांचेही सत्कार गणेश झोरावर यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी एलजी गायकवाड यांनी थोडक्यात माहिती दिली तसेच गटविकास अधिकारी यांनीही गावातील लोकांची विविध विषयावर चर्चा केली त्यांना समाधानकारक उत्तरे दिली, गावातील विविध योजना घेतलेले बहुसंख्य नागरिक कार्यक्रमाला उपस्थित होते कार्यक्रमात विविध विषयावर चर्चा झाली गटविकास अधिकारी यांच्या आग्रहाखातील सरपंच यांना दोन शब्द बोलावे त्यांच्या विनंतीला मान देऊन गावातील जनतेला ज्या योजनेचा लाभ दिला आहे त्या लाभार्थ्यांची संपूर्ण माहिती सरपंच करणसिंह राजपूत यांनी भाषणाद्वारे सर्वांना दिली व विविध योजना गावातील सर्वांगीण विकासासाठी आम्ही कायमस्वरूपी तत्पर आहोत येणाऱ्या काळात आम्ही अजून शासनाच्या योजना सामान्य जनतेपर्यंत पोहोचू असे आमच्या काळात घरकुल योजना स्वच्छालय रोजगार हमी योजनेतून विहीर गाय गोठे रेशन कार्ड मोदी आवास घरकुल योजना रमाई घरकुल योजना अशा अनेक योजना आम्ही गावात योग्यरीत्या राबवले आहे व येणाऱ्या काळात गावातील सर्व लाभार्थ्यांना आम्ही योजनेचा लाभ देऊ असे व्यासपीठावर बसलेल्या सर्व मान्यवरांना सांगितले.

ह्या कार्यक्रमानिमित्त कृषी विभागाचे तारगे साहेब आरोग्य विभागाचे बहुरे साहेब ढेपे सर भूमी अभिलेख कार्यालयाचे लगड मॅडम अंगणवाडी विभागाची शिंदे मॅडम कुलकर्णी मॅडम यांची कृषी सहाय्यक इंगळे सर गायकवाड सर पवार सर पंचायत समिती विभागाचे ससाने सर शिंदे सर दांडेकर आप्पा ग्रामपंचायत चे ग्रामसेवक सचिन बनसोडे मुख्याध्यापक राजपूत सर साबळे मॅडम रोजगार सेवक कल्याण मेहेर शिपाई सुरेश मोरे आशाताई प्रमिला राऊत ऑपरेटर संदीप राऊत संतोष महेर जीवन चंदवाडे जितेश चंदवाडे मोहन कोंडे संतोष छापले अरुण ठाकूरकर मोहन ताटू विजय चंदवाडे जीवन मुंजा रमेश शिरे कपूरचंद चंदवाडे प्रतापसिंह चंदवाडे अभिषेक चंदवाडे असे अनेक गावकरी उपस्थित होते भारत माता की जय जय घोषाने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला व जाता जाता गटविकास अधिकारी यांनी सरपंच व ग्रामसेवक यांना कार्यक्रम छान प्रकारे घेतला असा आनंद व्यक्त केला



# मालेगाव शहरात कायमस्वरूपी पोलिस आयुक्तालय झाले पाहिजे : खा.डॉ. भामरे

आधुनिक केसरी न्यूज

**संकेत बागरेचा**

**धुळे :** अतिसंवेदनशील शहर आहे. जगातल्या कुठल्याही घटनेचे पडसाद मालेगाव शहरात उमटतात. हिंदु-मुस्लिम दंगलीचा मोठा इतिहास शहराला आहे. गोतस्करी सारखे प्रकार हि शहरात होतात. शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे तसेच बाहेरच्या राज्यातुन मोठ्या प्रमाणात लोक येऊन वास्तव्य करत आहे त्यामुळे लोकसंख्येचा असमतोल निर्माण होतच आहे पन त्यासोबत शहरात मोठ्या प्रमाणात गुन्हेगारी हि वाढत आहे. परिसरात हॅन्डलुम व्यवसाय सोडला तर इतर कोणताही व्यवसाय नाही. आजुबाजुला बागायती भाग भरपुर आहे पन सुरक्षेचा कारणास्तव फुड प्रोसिंसग कंपनी उभे राहणे अवघड झाले आहे.

छोट्या छोट्या कारणावरून शहरात तणाव निर्माण होतो अशावेळी शहरातील पोलिस यंत्रणा संख्येने खुप कमी पडते व बाहेरून पोलिसांची तुकडी पाचारण करावी लागते कधी सैन्याला ही बोलवावे लागते. १२० किमी दुर असलेल्या नाशिक आयुक्तालय मधुन पोलिस यंत्रणा सक्षमपणे राबवणे हे



कठीण आहे,खर्चिक सुद्धा आहे आणि वेळ घेणारे पन आहे. साधारण २ तास दुर असल्याने असल्याने पोलिस यंत्रणा अचानक उद्भवणार्या समस्या ना पुरेशी नाही. म्हणुनच, मालेगाव शहरामध्ये कायमस्वरुपी पोलिस आयुक्तालय स्थापन करावे अशी मागणी 18 डिसेंबर रोजी धुळ्याचे खासदार डॉ.सुभाष भामरे यांचासमवेत हिंदुत्वाचे बुलंद आवाज श्री.नितेश राणे,ॲड शिशिर हिरे, प्रदीपजी (आबा) बच्छाव, यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस जी यांचासमोर केली. त्यांची भेट घेतली व निवेदन देऊन पुर्ण समस्या अवगत करून दिली.

राज्याचे गृहमंत्री म्हणुन श्री.देवेंद्र फडणवीस जी यांनी परिस्थितीचे अवलोकन करून लवकर निर्णय घेऊ असे आश्वासन दिले.

मालेगाव येथे कायम स्वरूपी पोलिस आयुक्तालय आल्याने मोठ्या प्रमाणात गोत्सकरी ला आळा बसेल.त्याचप्रमाणे शहरातील गुन्हेगारी कमी होईल.

महत्वाचे म्हणजे शहरात संख्येने कमी असलेल्या समाजाला अजुन सुरक्षित वातावरण भेटेल. स्त्री सुरक्षा महत्वाचा मुद्दा आहे. अजुन सुरक्षित वातावरण पोलिसांची कुमक वाढल्याने होईल. अनेक नविन उद्योग सुरक्षेची हमी झाल्याने उभे राहतील असा विश्वास खासदार डॉ.सुभाष भामरे ह्यांनी व्यक्त केला.

# संत गाडगेबाबा यांच्या 67व्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील किनगांव येथे संत गाडगेबाबा यांची 67वी पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी संत गाडगेबाबा यांच्या मुर्ती पुजन करण्यात आले तसेच गावात स्वच्छता दिंडी काढण्यात आली या वेळी न्यु हायस्कूल शाळा किनगांव व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी या सहभाग घेतला तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी वर्ग गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते या वेळी सरपंच उपसरपंच सदस्य ग्रामविकास अधिकारी व गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.



# कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी करण्याची राष्ट्रवादीची मागणी

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** शासनाच्या विविध विभागात कार्यरत कंत्राटी कर्मचार्यांना सेवेत कायमस्वरूपी करा किवा वयाच्या ५८ वर्षापर्यंत नोकरीची हमी द्या अश्या प्रकारची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामार्फत रणजीत राजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी यांच्या कडे करण्यात आली.
धुळे जिल्ह्यामध्ये शासनाची विविध कार्यालये,आस्थापना मध्ये गेल्या काही वर्षा पासून कंत्राटी कर्मचारी काम करीत आहे. कंत्राटी कर्मचार्यांनी वर्षानुवर्षे आपल्या कामातून,कष्टातून विविध योजनान द्वारे जनतेची सेवा केलेली आहे. आपल्या जीवनातील तरुणपणाचा, उमेदीचा काळ सेवा व काम करण्यासाठी खर्च केला आहे.
परंतु कंत्राटी कर्मचार्यांना नोकरीची हमी नाही,काही कर्मचार्यांना ESIC,EPF,विमा मिळत नाही शासकीय काम करत असताना काही अपघात झाल्यास कोणतीही ग्यारंटी,हमी नाही.अश्या कार्माच्यार्यांवर संपूर्ण कुटुंब अवलंबून आहे. सर्व विभागातील कंत्राटी कर्मचारी हे मनापासून प्रामाणिकपने आपली सेवा शासनाला व जनतेला देत आहे.परंतु त्यांना कोणीही वाली नाही.
आज जिल्ह्यामध्ये रोजगार हमी योजना,प्रधान मंत्री घरकुल योजना,जलजीवन मिशन,राष्ट्रीय आरोग्य अभियान,सर्व शिक्षा अभियान,ठिबक सिंचन योजना,पाणलोट कार्यक्रम,जलसंधारण कार्यक्रम,सेतू,जिल्हा नियोजन समिती, भूसंपादन, वन्हक्क कायदा, महिला बाल कल्याण, स्वधार,जात पडताडनी, समाजकल्याण, सिंचन, पाटबंधारे, बांधकाम, महात्मा फुले आरोग्य अभियान, महानगरपालिका जिल्हा परिषद,पंचायत समिती, तहसील, प्रांत, जिल्हाधिकारी कार्यालय अशा विविध आस्थापना व योजनेमध्ये काम करणाऱ्या तांत्रिक अधिकारी, इंजिनिअर,लिपिक,डाटा एन्ट्री ऑपरेटर, गृहनिर्माण अभियंता,APO,सुपर वाईजर, कॉम्पुटर ऑपरेटर,समन्वयक,शिपाई कुशल, अकुशल कर्मचारी अश्या विविध नावाने कार्यरत आहेत.
यासर्व शासकीय विभागातील कंत्राटी कर्मचार्यांना शासकीय सेवेत कायमस्वरूपी सामावून घ्यावे. किंवा या सर्व कंत्राटी कर्मचार्यांना वयाच्या ५८ व्या वर्षा पर्यंत काम करण्याची शासनाने हमी द्यावी. अशी मागणी राष्ट्रवादी पक्षाने जिल्हाधिकारी साहेब यांच्या कडे केली. यावेळी रणजित राजे भोसले, जोसेफ मलबारी, शकीला बक्ष, अमित शेख, सलमान खान, राजू मशाल,युसूप शेख,नुरुद्दीन शहा, अब्दुल कादीर, हाशिम कुरेशी, रईस काजी, वैभव पाटील, राजू चौधरी, राजेंद्र सोलंकी, डी.टी.पाटील, अस्लम भाई, भटू पाटील, मंगलदास वाघ, राजेश तिवारी, डोमेनिक मलबारी,सुरेश जवराळ, दीपक देवरे, रामेश्वर साबळे,बरकत अलि शाह, राजू डोमाळे, चेतना मोरे, जयश्री घेटे,चेतन पाटील, विशाल भामरे,जाकीर खान, दीपक देसले, मलबारी,आदि उपस्थित होते.

# तलाठ्यावर गौण खनिज तस्करांचा जीवघेणा हल्ला




आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** गौण खनिज तस्करी रोखण्यासाठी गेलेल्या तलाठ्यावर रेती व माती माफियांनी जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात तलाठी मोडके हे गंभीर जखमी झाले असून तहसील कार्यालयाचे वाहन चालक आडे किरकोळ जखमी झाले आहेत. बुधवारी रात्री १० वाजताच्या सुमारास महागाव तालुक्यातील काळी टेंभी परिसरात ही घटना घडली. बुधवारी जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी महागाव तहसील कार्यालयात विभाग निहाय आढावा बैठक घेतली. फुलसावंगी परिसरात प्रचंड प्रमाणात रेती आणि मातीचे अवैध उत्खनन करण्यात येत आहे. ही गौण खनिज तस्करी रोखण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी या बैठकीत सक्त कारवाईचे आदेश दिले होते. आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी महागाव तहसील कार्यालयाचे रात्र गस्ती पथक फुलसावंगी परिसरात टेहळणी करीत असताना काळी टेंभी येथे मातीचे अवैध उत्खनन व वाहतूक करण्यात येत असल्याचे पथकाच्या निदर्शनास आले. पथक कारवाई करण्यासाठी सरसावले असता १० ते १५ गौण खनिज तस्करांनी तलाठी मोडके यांच्यावर प्राण घातक हल्ला चढविला, तसेच तहसीलच्या वाहनाचे चालक आडे यांनाही मारहाण केली. त्यानंतर गौण खनिज तस्कर पळून गेले. गंभीर जखमी झालेल्या अवस्थेतच तलाठी मोडके पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेले. महागाव शहरासह तालुक्यातील गौण खनिज तस्कर शिरजोर झाले आहेत.

# स्वामी समर्थ केंद्रात अखंड नामजप यज्ञ सप्ताह

आधुनिक केसरी न्यूज

**धर्माबाद :** अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर नाशिक चे पिठाधीश प पू गुरुमाऊली च्या आदेशाने प्रतिवर्षी प्रमाणे श्री दत्त जयंती निमित्त श्री स्वामी समर्थ सेवा अध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्र (दिंडोरी प्रणित) धर्माबाद जिल्हा नांदेड येथे दिनांक 20डिसेंबर 2023 ते 27डिसेंबर 2023 पर्यंत दररोज सकाळी नित्यास्वःकार सकाळीं 8:00 भूपाळी आरती सकाळी 8:30 ते 10: 00वाजेपर्यंत सामूहिक गुरुचरित्र पठण 10:30 वाजता नैवद्य आरती दुपारी 1: 00ते 5: 00वाजेपर्यंत सामुहीक स्वामी चरित्र, दुर्गासप्तशती. रूद्र पठण सामुहीक सेवेचे अयोजन सायंकाळीं 6:30 वाजता नैवद्य आरती श्री गुरूचरित्र पठण साठी महीला/ पुरूष सेवेकरी 175 सेवेकरी सहभाग नोंदवला. दररोज सकाळी 6: 00ते 7:00 दिनांक 21डिसेंबर 2023रोजी श्री गणेश याग व मनोबोध याग दिनांक 22डिसेंबर 2023रोजी गीताई याग दिनांक 23डिसेंबर 2023रोजी श्री स्वामी याग दिनांक 24डिसेंबर 2023रोजी चंडी याग दिनांक 25डिसेंबर 2023रोजी रूद्र याग व मल्हारी याग होणारं आहे. दररोज सायंकाळी सामुहीक विष्णू सहस्त्र पठण आहेत आणि हनुमान चालीसा पठण करण्यात आले होते. दिनांक 26डिसेंबर 2023रोजी श्री दत्त जन्मोस्तव उत्सवचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहाची सांगता समारोह 27 डिसेंबर 2023रोजी करण्यात येणार असल्याची माहिती प्रस्तुत प्रतिनिधी शी बोलताना देण्यात आली.





सर्व सामान्यांना वकिली व्यवसायातून न्याय देण्याचे काम केले म्हणून ॲड. जी.जी. सूर्यवंशी (बिजूरकर) यांना लायर्स डे सेलीब्रेशन कार्यक्रमात सन्माननीय उच्च न्यायालयाचे ज्येष्ठ न्यायमूर्ती आर. व्ही. घुगे व न्यायमूर्ती वाय. जी. खोब्रागडे यांच्या हस्ते विश्वविख्यात कायदे पंडित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी सेवा पुरस्कार 2023-24 देण्यात आला.

# संत गाडगेबाबा यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** स्वच्छतेचे जनक राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त येथील संत गाडगेबाबा समाज मंदिरात बुधवार (ता,२०)रोजी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते,आरंभी संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन सामाजिक कार्यकर्ते व स्वच्छता दूत धोंडीरामसिंह राजपूत यांनी ,प्रवचनकार हभप हरिनाथ ढंगारे महाराज, माजी पोलीस अधिकारी सोपानराव निकम,आसाराम निकम,बापू गावडे यांच्या हस्ते हस्ते करण्यात आले, हभप ढंगारे महाराज यांचे प्रवचन झाले,या दरम्यान माजी आमदार भाऊसाहेब पा. चिकटगावकर, माजी नगराध्यक्ष डॉ,दिनेश परदेशी ,माजी नगराध्यक्ष बाळासाहेब संचेती, विशाल संचेती यांनी भेट देऊन संत गाडगेबाबा यांना आदरांजली अर्पण केली. या प्रसंगी शिवसेना तालुका प्रमुख राजेंद्र पा, साळुंके,शहर प्रमुख पारस घाटे बाजार समिती संचालक प्रशांत त्रिभुवन,श्रीकांत साळुंके, जवाहर कोठारी प्रशांत शिंदे, माजी नगर सेवक प्रकाश चव्हाण, शैलेश चव्हाण, गणेश खैरे, सचिन वाणी शिवसेना जिल्हा महिला आघाडी अध्यक्ष सुलभाताई भोपळे,माजी नगरसेविका सुप्रिया व्यवहारे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक व सूत्र संचलन धोंडीराम ठाकूर यांनी केले. या प्रसंगी किशोर गायकवाड, योगेश गवळी, सोपान निकम, बबन क्षीरसागर, अमोल गायकवाड, सुखदेव गायकवाड, राजेंद्र हौसारे, अजिनाथ आहेर, बाबा त्रिभुवन, आबा त्रिभुवन, सचिन राऊत, मचिंद्र गायकवाड यांनी सहभाग नोंदविला. प्रवचननंतर महाप्रसाद सर्वांना प्रदान करण्यात आला.



# हरण्यामाळ पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्याचे मंत्री उदय सामंत यांचे आदेश

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** औद्योगिक वसाहतीचा विस्तार करण्यासाठी रावेर शिवारातील जमीन अधिग्रहित करणे आणि औद्योगिक वसाहतीस नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा होण्याच्यादृष्टीने हरण्यामाळ पाणीपुरवठा योजना कार्यान्वयीत करणेबाबत हिवाळी अधिवेशनाच्या कालावधीत आ. फारुख शाह यांच्या मागणीनुसार उद्योगमंत्री ना.उदय सामंत यांनी संबंधित अधिका-यांची बैठक आपल्या दालनात आयोजित केली होती. या बैठकीत रावेर शिवारातील जमीन अधिग्रहित करणे आणि औद्योगिक वसाहतीचा विस्तार करण्यासाठी रावेर शिवारातील जमीन अधिग्रहित करणे संदर्भात तातडीने पुढील कार्यवाही करण्याचे आदेश दिलेत. धुळे शहरात मोठे उदयोग धंदे नसल्याने तसेच धुळे शहरातील महामार्गालगत असलेल्या M.I.D.C. ची जागा अपूर्ण पडत असून त्यासाठी शासनाने रावेर शिवारातील जागेची निवड केली होती. परंतु प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या कासव गतीच्या कामामुळे हे काम रेंगाळलेले आहे. धुळे शहरात बेरोजगारीचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात आहे. रावेर शिवारातील ९८ एकर जागेवर M.I.D.C. झाल्यास धुळे शहरातील १० हजार ते १५ हजार युवकांच्या बेरोजगारीचा प्रश्न सुटणार आहे. यामुळे बेरोजगारीचे प्रमाण घटून धुळे शहरातील युवकांच्या हाताला काम मिळेल व महाराष्ट्र राज्याच्या प्रगतीला चालना मिळेल. रावेर शिवारातील ९८ एकर जमिनीचे १९८० च्या अगोदर निर्वनीकरण झाले असल्याने महसूल विभागाने मोजणी करून जमीन ताब्यात घ्यावी असे निर्देश ना.उदय सामंतांनी दिले तसेच धुळे औद्योगिक वसाहतीस सुरळीत आणि नियमित पाणीपुरवठा व्हावा यासाठी हरण्यामाळ पाणीपुरवठा योजना प्रस्तावित आहे. हरण्यामाळ पाणीपुरवठा योजना तातडीने कार्यान्वयीत व्हावी यादृष्टीने प्रशासनिक अडचणी सोडविणे गरजेचे आहे.वन विभागाची परवानगी आणि हरण्यामाळ मध्यम प्रकल्पातील पाण्यावर आरक्षण टाकण्याची कार्यवाही तत्काळ करून हरण्यामाळ पाणीपुरवठा योजनेच्या कामाची निविदा प्रसिद्ध करावी असे आदेश उद्योग मंत्री ना.उद्या सामंत यांनी दिले. रावेर शिवारातील जमीन अधिग्रहित करणे आणि औद्योगिक वसाहतीस नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा होण्याच्यादृष्टीने हरण्यामाळ पाणीपुरवठा योजना कार्यान्वयीत करण्याचा प्रश्न मार्गी लागल्यामुळे धुळेकर नागरिक आणि उद्योजकांनी आनंद व्यक्त केला आहे.धुळे औद्योगिक वसाहतीचा महत्वाचे प्रश्न मार्गी लावल्यामुळे आ.फारुख शाह यांनी उद्योग मंत्री ना.उद्या सामंत यांचे आभार मानले आहे. या बैठकीस उद्योग म.औ.वि.महामंडळाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी सोनाली मुळे,मुख्य अभियंता राजेंद्र गावडे,कार्यकारी अभियंता सुधाकर गांधीले,अतिरिक्त जिल्हाधिकारी केकान आणि जलसंपदा विभाग मध्यम प्रकल्प धुळे चे कार्यकारी अभियंता प्रशांत पाटील आदी उपस्थित होते.

# चंद्रपूरसह वरोरा, मुल, पोंभुर्णा एमआयडीसी परिसरातील रिकामे भूखंड परत घेणार

## भूखंड वाटपाची प्रक्रिया राबविताना अगोदर स्थानिकांना प्राधान्य देणार : मंत्री उदय सामंत

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्ह्यातील एमआयडीसी परिसरातील खाली भूखंड परत घेणार असून, नवीन लोकांना भूखंड वाटपाची प्रक्रिया राबविताना अगोदर स्थानिकांना प्राधान्य देणार असे आश्वासन उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिली.

चंद्रपूर बाजार समितीचे माजी सभापती कॉंग्रेसचे नेते दिनेश दादापाटील चोखारे यांनी उद्योग मंत्री उदयजी सामंत यांना भेटून याबाबत निवेदन दिले. यावेळी पवन अगदारी उपस्थित होते.

चोखारे यांनी निवेदनात म्हटले आहे की, चंद्रपूर जिल्हा हा औद्योगिक जिल्हा म्हणून ओळखला जातो. मात्र अलिकडच्या काळात जिल्ह्याची ओळख पुसली जात आहे. जिल्ह्यातील उद्योग कमी होत आहेत. त्या तुलनेत बेरोजगारांची संख्या झपाट्याने वाढत आहे. चंद्रपूरसह वरोरा, भद्रावती, मूल, पोंभुर्णा, राजुरा, तालुक्यात उद्योगांना चालना देण्यासाठी एमआयडीसीची निर्मिती करण्यात आली आहे. एमआयडीसींचे सर्व जमिनी उद्योजकांनी अधिग्रहितही केल्या आहेत. मात्र कित्येक वर्षांपासून या जमिनीवर उद्योग उभे राहिलेले नाहीत. बहुतांश एमआयडीसी परिसर ओसपडल्याचे दिसून येत आहे. चंद्रपूर शहर उद्योगांचे शहर आहे. कोळसा खाणी, वीज केंद्र, एमईएल, असे कारखाने शहराच्या सभोवताल आहेत. तरीही जिल्ह्याचे



स्थान आणि वाढती बेरोजगारी टाळण्यासाठी शहरासाठी दाताळा मार्गावर एमआयडीसीची उभारणी करण्यात आली आहे. या एमआयडीसीतही काही उद्योग उभे झाले आहेत. मल्टीऑर्गनिक हा उद्योग सोडला तर डोळ्यात भरण्याएवढा मोठा उद्योग या परिसरामध्ये नाही. काही उद्योग एमआयडीसीत दिसत असले तरी अनेक जमिनी अद्यापही रिकाम्या आहेत. उद्योगाच्या नावावर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जागेवर स्वस्तात भूखंड मिळतात म्हणून केवळ जिल्ह्यातीलच नव्हे तर जिल्ह्याबाहेरील शेकडो लोकांनी विविध एमआयडीसीत भूखंड घेतले. आश्चर्याची गोष्ट अशी की या भूखंडधारकांचा उद्योग भूखंड बुक करण्यापलिकडे पुढे सरकलाच नाही. आज जर कोणीही अशा एमआयडीसीचा फेरफटका मारला तर उजाड माळरानापलिकडे या एमआयडीसीत काहीच दिसून येत नाही. शासनाला विविध शहरातील एमआयडीसीची खरोखरच प्रगती बघायची असेल तर ज्यांनी ज्यांनी येथील भूखंड बुक केले आहेत, त्यांच्याकडून अगोदर हे भूखंड परत घेण्याची प्रक्रिया सुरू करावी. भूखंड परत घेतल्यानंतर नवीन लोकांना भूखंड वाटपाची प्रक्रिया राबविताना अगोदर स्थानिकांना प्राधान्यक्रम द्यावा अशी विनंती चोखारे यांनी केली. या विनंतीवर बोलताना उद्योग मंत्री उदय सामंत म्हणाले की, योग्य ती चौकशी करून स्थानिकांना प्राधान्य देऊ असे आश्वासन दिले. यावेळी सविस्तर चर्चा झाली.

# विशेष रेल्वे गाड्यांना मिळाली मुदतवाढ

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात सुरू करण्यात आलेल्या अनेक विशेष गाड्यांना मध्य रेल्वेने मुदतवाढ दिली. त्यामुळे रेल्वे प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. विदर्भातून मुंबई, पुणे, नाशिक, गोव्याला जाणे सोयीस्कर होणार आहे. अकोला, पूर्णा, लातूर, कुर्डूवाडी मार्ग धावणारी गाडी क्रमांक ०१४३९ पुणे-अमरावती विशेष गाडी ५ जानेवारी ते ३१ मार्चपर्यंत धावण्यासाठी वाढविण्यात आली आहे. या गाडीच्या २६ फेऱ्या होणार आहेत. गाडी क्रमांक ०१४४० अमरावती-पुणे विशेष गाडीच्या ६ जानेवारी ते १ एप्रिलपर्यंत २६ फेऱ्या धावणार आहेत. अकोला, भुसावळ, मनमाड, दौंड कॉर्ड लाईन मार्गे धावणारी गाडी क्र.०२१४४ नागपूर-पुणे साप्ताहिक विशेष ४ जानेवारी ते १५ फेब्रुवारी या कालावधीत धावणाार असून त्याच्या सात फेऱ्या होतील. गाडी क्रमांक ०२१४३ पुणे-नागपूर साप्ताहिक विशेष ५ जानेवारी ते १६ फेब्रुवारी या कालावधीत वाढविण्यात आली आहे. गाडी क्रमांक ०११३९ नागपूर-मडगाव विशेष गाडी ३ जानेवारी ते ३० मार्चपर्यंत धावेल. गाडी क्रमांक ०११४० मडगाव-नागपूर विशेष ४ जानेवारी ते ३१ मार्चपर्यंत धावणार आहे. या गाडीच्या प्रत्येकी २६ फेऱ्या होतील. गाडी क्रमांक ०१२११ बडनेरा-नाशिक व गाडी क्र. ०१२१२ नाशिक-बडनेरा विशेष गाडी ०१ जानेवारी ते ३१ मार्चपर्यंत धावणार आहे. या गाडीच्या प्रत्येकी ९१ फेऱ्या होतील. सीएसएमटी-नागपूर द्वि-साप्ताहिक विशेष गाडीला देखील मुदतवाढ देण्यात आली. गाडी क्रमांक ०२१३९ सीएसएमटी-नागपूर स्पेशल १ जानेवारी ते १५ फेब्रुवारीपर्यंत धावेल.

# 'जनसंवाद - २०२३' चे अकरा पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** येथील सप्तरंगी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित सप्तरंगी साहित्य मंडळाच्या जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाचे यावर्षीचे पुरस्कार जाहीर झाले असून त्यात सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्य अशा विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा समावेश करण्यात आला आहे. यावर्षी जनसंवाद पुरस्कार अकरा जणांना प्रदान करण्यात येणार आहे. यात डॉ. हेमंत कार्ले, डॉ. हेमंत सोनकांबळे, माजी उपप्राचार्य प्रल्हाद हिंगोले, पत्रकार गंगाधर धडेकर, जयश्री फुलारी, गोविंद कवळे, आम्रपाली मादळे, रणजीत वर्मा, व्यंकटी कुरे, देविदास गोडगे, छाया कांबळे यांचा समावेश करण्यात आला आहे.

सप्तरंगी साहित्य मंडळ आणि आनंद दत्तधाम आश्रम माहुरगड यांच्या संयुक्त विद्यमाने माहुरगडावर तिसऱ्या राज्यस्तरीय जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाचे आयोजन येत्या ३१ डिसेंबर रोजी करण्यात आले आहे. संमेलनाध्यक्ष सुप्रसिद्ध कवी अनंत राऊत, माजी संमेलनाध्यक्ष डॉ. राम वाघमारे, उद्घाटक ज्येष्ठ पत्रकार सरफराज दोसानी, सुप्रसिद्ध अभिनेते नामांतर कांबळे, स्वागताध्यक्ष सद्गुरू साईनाथ महाराज बितनाळकर, निमंत्रक एस. एन. पाटील, रमेश मुनेश्वर, सप्तरंगी साहित्य मंडळाचे राज्याध्यक्ष नागोराव डोंगरे, संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे यांच्या उपस्थितीत पुरस्कारचे वितरण होणार आहे. संमेलनास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# आवरे येथील मर्दनगडावर एकविरा आईच्या मंदिराचा लोकार्पण सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** स्वराज्यमंदिर संकल्पसिद्धी अभियानांतर्गत महाराष्ट्रातील ऐतिहासिक वास्तूंवरील मंदिरांची पुनर्बांधणीचा निर्धार सह्याद्री प्रतिष्ठान या दुर्गसंवर्धन संस्थेने केला आहे. या अभियानाचा भाग म्हणून उरण तालुक्यातील आवरे येथील मर्दनगडावर सह्याद्री प्रतिष्ठान व मर्दनगड संवर्धन समितीच्या पुढाकाराने आई एकविरा मातेचे मंदिर बांधण्यात आले असून या मंदिरामध्ये एकविरा आईची प्राणप्रतिष्ठापना शनिवार दिनांक १६ डिसेंबर रोजी तसेच लोकार्पण सोहळा रविवार १७ डिसेंबर रोजी उरणचे माजी आमदार मनोहशेठ भोईर व पी.पी. खारपाटील कंपनीचे संचालक राजेंद्र खारपाटील यांच्या शुभहस्ते मोठ्या दिमाखात पार पडला. या प्रसंगी उरण तालुकाप्रमुख संतोष ठाकूर, महाराष्ट्र भूषण राजू मुंबईकर, श्रीम. निराताई पाटील सरपंच-आवरे, कुलदीप नाईक, भरत देशमुख, भास्कर मोकल, शैलेश भोईर, संजय गावंड,महेश गावंड, सुरेश गावंड, संदीप गावंड, ग्रामस्थ तसेच अनेक शिवभक्त व एकविरा आईचे भक्त उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात आवरे गावातील शिवप्रतिमेस अभिवादन करून एकविरा आईच्या पालखीने झाली, मर्दनगडावर ध्वजपूजन, मंदिराचा लोकार्पण सोहळा व महाआरती घेण्यात आली. महाराष्ट्र भूषण शिवशाहीर वैभव घरत, शिवशाहीर वैदेही घरत तसेच शिवशाहीर अभिषेक पाटील यांच्या पोवाड्यांनी संपूर्ण गडपरिसरात उत्साह संचारला होता. या प्रसंगी मंदिराच्या उभारणीसाठी



सहकार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा सन्मान करण्यात आला.सह्याद्री प्रतिष्ठानचे संस्थापक डॉ. श्रमिक गोजमगुंडे यांनी स्वराज्यमंदिर संकल्पसिद्धी बद्दल विस्तृत माहिती दिली तर माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कौशिक ठाकूर यांनी सर्वांचे आभार मानले तर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सुरेश भोईर,दिलेश ठाकूर, शंकर पाटील,गुरुनाथ गावंड,हितेंद्र म्हात्रे,विनोद ठाकूर, दिपेश ठाकूर,धीरज ठाकूर ,राजू गावंड,संतोष म्हात्रे, तुषार म्हात्रे,किशोर गावंड,प्रशांत भोईर,अभिषेक ठाकूर,अलंकार ठाकूर,निलेश ठाकूर,चेतन पाटील,सुहास गोवारी नारंगीकर, संकेत ठाकूर,सुयोग पाटील व कार्यकर्ते यांनी मेहनत घेतली.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर